# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १९१ वा ❑ भारतीय सौर दिनांक २४ भाद्र. शके १९४८, मंगळवार दि.१५ सप्टेंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## स्क्रीनचा अतिवापर: विद्यार्थ्यांची वाचन क्षमता धोक्यात!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

एका आंतरराष्ट्रीय अहवालानुसारस्क्रीनचा अतिवापर विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेसाठी एक मोठा धोका बनत आहे. आजकाल मुले पुस्तकांऐवजी मोबाईल, टॅबलेट आणि कॉम्प्युटर स्क्रीनवर जास्त वेळ घालवत आहेत. यामुळे त्यांच्या एकाग्रतेवर आणि एकूणच मानसिक विकासावर गंभीर परिणाम होत आहे.

सोशल मीडिया व एआय मुळे विद्यार्थ्यांची वाचन क्षमता कमकुवत होत आहे विद्यार्थी जास्तीत जास्त वेळ डिजिटल उपकरणांवर राहत असल्याने विद्यार्थ्यांची वाचन क्षमता कमी होत आहे हे एक फार मोठे आव्हान आजच्या विद्यार्थ्यांसमोर आहे.

आजच्या डिजिटल युगात, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता प्रभाव आणि स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवल्यामुळे एकाग्रता व वाचन क्षमतेत झालेली घट ही विद्यार्थ्यांसमोरील मोठी आव्हाने बनली आहेत. रील्स, शॉर्ट्स आणि सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांची लक्ष देण्याची क्षमता लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. एका आंतरराष्ट्रीय अभ्यासातून हे स्पष्ट झाले आहे.

शाळा महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी अभ्यास करतात मात्र हा अभ्यास केवळ नाममात्र स्वरूपाचा विद्यार्थी पाच तासांपेक्षा जास्त वेळ स्क्रीन समोर घालवत असल्याने विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेवर व निकालावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होत आहे.गृहपाठ किंवा प्रकल्पांसाठी केवळ एआय साधनांवर (जसे की चॅटजीपीटी) अवलंबून राहिल्याने विद्यार्थ्यांची स्वतःहून विचार करण्याची, विश्लेषण करण्याची आणि समस्या सोडवण्याची क्षमता कमकुवत होत आहे.

विद्यार्थी अनेकदा स्क्रीनवरील महत्त्वाचे शब्द वरवर पाहतात, त्यामुळे त्यांना विषयाची खोली आणि अर्थ समजण्यास अडचण येते.स्क्रीनमधून बाहेर पडणाऱ्या निळ्या प्रकाशामुळे झोपेच्या चक्रावर परिणाम होतो, ज्यामुळे दुसऱ्या दिवशी अभ्यास करणे अवघड होते.

सोशल मीडिया आणि रिल्सच्या सवयीमुळे मुले पुस्तके सखोल वाचण्याऐवजी स्क्रीनवरील मजकूर फक्त वर-वर स्क्रोल करतात आणि घाईघाईने चुकीचे उत्तर देतात.विद्यार्थी अभ्यासाव्यतिरिक्त दररोज सरासरी ३.४ तास केवळ मनोरंजनासाठी स्क्रीनसमोर घालवत आहेत. दिवसातून ५ तासांपेक्षा जास्त स्क्रीन वापरणाऱ्या मुलांचे शैक्षणिक नुकसान सर्वात जास्त होत आहे.चॅटबॉट्स आणि एआय () टूल्सचा वापर करून निबंध लिहून घेणे किंवा पाठाचा सारांश तयार करून घेणाऱ्या विद्यार्थ्यांची विचार करण्याची आणि स्वतः मूल्यमापन करण्याची क्षमता कमी झाली आहे.

संशोधनानुसार, जेव्हा मुले स्क्रीनवर वाचतात, तेव्हा त्यांची विचार प्रक्रिया उथळ होते. याउलट, छापील पुस्तके वाचताना मेंदूला अक्षरांचे अर्थ लावणे, दृश्यांची कल्पना करणे आणि तपशील लक्षात ठेवणे यासाठी अधिक कष्ट घ्यावे लागतात, ज्यामुळे बौद्धिक क्षमता मजबूत होते. तसेच, लहाना वयात टॅब्लेट किंवा स्क्रीनवर लिहिण्या/वाचण्याच्या सवयीमुळे मुलांना अक्षरांमधील फरक ओळखण्यातही अडचणी येत असल्याचे समोर आले आहे.

स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सरावाची आणि अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याची क्षमता कमी होत चालली आहे, हे आजच्या काळातील एक खूप मोठे आणि गंभीर आव्हान आहे.

सोशल मीडिया, गेम्स आणि सतत येणारे नोटिफिकेशन्स यामुळे विद्यार्थी एकाग्रतेने सराव करू शकत नाहीत. स्क्रीनवर तयार माहिती सहज उपलब्ध असल्यामुळे स्वतः विचार करून गणित सुटवणे किंवा उत्तरे शोधण्याची सराव करण्याची सवय कमी होते. तासनतास स्क्रीन पाहिल्यामुळे डोळ्यांवर आणि मेंदूवर ताण येतो, ज्यामुळे अभ्यासाचा कंटाळा येतो.स्मरणशक्तीवर परिणाम: स्क्रीनवरील शॉर्ट-फॉर्म कंटेंट मुळे विद्यार्थ्यांची दीर्घकाळ लक्षात ठेवण्याची क्षमता कमी होत आहे.

आंतरराष्ट्रीय अहवालानुसार (विशेषतः च्या अहवालानुसार) जास्त स्क्रीन टाईममुळे जगभरातील विद्यार्थ्यांची वाचन क्षमता आणि शैक्षणिक गुणवत्ता लक्षणीयरीत्या घटली आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या अहवालात ९१ देशांमधील सुमारे ७ लाख ६० हजार विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्यात आला.

सन २०१२ मध्ये वाचन क्षमतेचा आंतरराष्ट्रीय स्कोअर ५०१ वर होता, तो आता घसरून ४६६ वर आला आहे. वाचन क्षमतेसोबतच विद्यार्थ्यांचे गणित (५०२ वरून ४६९) आणि विज्ञान (५०६ वरून ४८६) या विषयातील गुणही या शतकातील नीचांकी पातळीवर पोहोचले आहेत.आजचे १५ वर्षांचे विद्यार्थी हे २०१२ मधील विद्यार्थ्यांच्या तुलनेने जवळपास २ वर्षे मागे पडले आहेत.

मुलांची वाचन क्षमता सुधारायची असेल, तर जेवताना, अभ्यासाच्या वेळी आणि झोपण्यापूर्वी १ तास आधी स्क्रीन पूर्णपणे बंद ठेवावा. मुलांना ई-बुक्स ऐवजी हातात धरून वाचता येणारी कागदी पुस्तके किंवा गोष्टींची पुस्तके आणून द्यावी. पालकांनी दररोज किमान १५ ते २० मिनिटे मुलांसोबत बसून वाचन करावे. यामुळे मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण होते.

स्क्रीन टाईम पासून दूर राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी वाचन क्षमता विकसित करायला पाहिजे.वाचन क्षमता विकसित करण्यासाठी नियमित सराव, योग्य पद्धती आणि वाचनाची आवड निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे सुरुवातीला रोज फक्त १० ते १५ मिनिटे वाचनासाठी बाजूला ठेवा. हळूहळू हा वेळ वाढवा. दिवसभरातून एकदा (उदा. सकाळी किंवा झोपण्यापूर्वी) वाचनाची सवय लावा. कामाऐवजी तो एक आनंदाचा भाग बनवा: जी गोष्ट वाचायला आवडते (उदा. कथा, कादंबऱ्या, आत्मचरित्रे, वर्तमानपत्र किंवा कॉमिक्स) त्यापासून सुरुवात करा. जर मुलांची वाचन क्षमता वाढवायची असेल, तर त्यांच्या आवडीनुसार रंगीबेरंगी आणि चित्रांच्या पुस्तकांची निवड करावी.

# अभियंत्याचे प्रेरणा स्थान, भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यानी सामाजिक कार्यातील अभियंत्याचे योगदान, त्यांच्या सकारात्मक कृतीतून जगापुढे आणले त्यामुळे समाजाचा अभियंता यांचेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून राष्ट्राच्या विकास पर्वात अभियंत्याचे योगदान महत्वाचे ठरत आहे. थोडक्यात अभियंता ह्या पदाचा दर्जा विश्वेश्वरय्या यांचे प्रयत्नाने उंचावला गेला आणि त्याचमुळे विश्वेश्वरय्या हे अभियंत्याचे प्रेरणा स्थान ठरले आहेत.

विश्वेश्वरय्या यांनी वयाच्या बत्तीसाव्या वर्षी कर्नाटक राज्यात मुख्य अभियंता ह्या पदापर्यंत आपल्या बुद्धि कौशल्याच्या माध्यमातून पोहचले. आपल्या पदाचा समाजाभिमुख उपयोग करून आपल्या सेवेच्या कार्य काळात कृष्णराज सागर धरण डिझाईन करून दगडी बांधकाम करून दाखविले आजही दिमाखाने ते धरण दिसत असून अनेक शेतकरी मित्रांना त्याचा लाभ झाला आहे. म्हैसूर येथील वृंदावन गार्डन कल्पकतेने तांत्रीक बाबींचा वापर करून तयार केले आहे. तेथे अनेक भारतीय लोकप्रीय सिनेमाचे शुटिंग झाले आहे आजही होत आहे. आज जे बंगलुरू शहर आपण पहात आहोत त्याची नियोजन पूर्वक दुरदृष्टीने रचना केली असून रस्त्याचे योग्य नियोजन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. म्हैसूर सँण्डल सोप फॅक्टरीसाठी त्याच प्रमाणे भद्रावती आयर्न स्टील कंपनी, हिंदुस्थान एरोनॅटीक्स, बँक ऑफ म्हैसूर अशा अनेक संस्थानाची त्यांनी परिश्रम पूर्वक निर्मिती करून समाज सेवेची पाठराखण आनंदाने, आत्मियतेने आपुलकी मनात ठेवून केली आहे. लेकराचे पाय पाळण्यातच दिसतात ह्या म्हणी प्रमाणे ते कार्यकारी अभियंता या पदावर असताना त्यांनी जिल्हा पुणे येथील खडकवासला धरणासाठी ऑटोमॅटिक स्लुइस गेट चे संशोधन करून बसविले होते तेव्हा पासून त्या गेटला विश्वेश्वरय्या गेट म्हणून ओळखले जाते. ह्या कामाची फळे आज कर्नाटक अन् महाराष्ट्र उपभोगत आहे. इतर राष्ट्रानी ह्याचे अनुकरण केले आहे. त्यामुळे आज देशाची प्रगति कडे घोडदौड सुरू असल्याचे आपण पहातो आहे. आजही त्यांच्या ह्या कृतीचा आदर्श सर्व स्तरातील अभियंते यांना अनुकरणीय आणि प्रेरणा देणारा ठरतो आहे. त्यांच्या ह्या सर्व सकारात्मक समाजकल्याण साठी केलेल्या कार्याची




दखल घेवून भारत सरकारने त्यांना सर्वोच्च बहू मान असलेला भारतरत्न पुरस्कार इ.स १९५५ साली देवून गौरव करण्यात आला. तसेच म्हैसूर राज्याचे दिवाण म्हणून त्यांना सन्मानाने गौरविण्यात आले. अशा या महान व्यक्तीचा १५ सप्टेंबर १८६१ मध्ये मुदेनहळ्ळी ता. चिंकबेळापूर जि कोलार कर्नाटक येथे जन्म झाला असून १५ सप्टेंबर हा दिवस त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून जागतिक अभियंता दीन म्हणून सर्व ठिकाणी एक उत्सव म्हणून धूम धडाक्यात साजरा केला जातो. विद्यमान कार्यऱ्हत अभियंत्याने जर निष्ठापूर्वक, भ्रष्टाचार विरहीत नियोजन पूर्वक काम केले तर समाजामध्ये समाजाकडून त्यांना असाच बहूमान मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. कोणाच्या दबावाखाली, स्वार्थ बाजूला ठेऊन, प्रसिद्धी परागंमुख राहुन, कौशल्याने नियोजन पूर्वक, अहंकार विरहीत कार्यपद्धती अवलंबून यशस्वी कार्य करण्याची गरज असून त्या प्रमाणे कार्य केल्यास अभियंता खऱ्या अर्थाने विकासाचा कणा आहे हे समाजाला पटल्या शिवाय राहणार नाही.

सर विश्वेश्वरय्या यांना अभियांत्रिकी क्षेत्राचे खरे शिल्पकार म्हणून आदराने ओळखले जातात. कारण ते अभियंता क्षेत्राचे भीष्माचार्य




आहेत. भारतीय तंत्रज्ञानाचे पितामहच आहेत.

ह्याशिवाय ब्रिटीश गव्हर्नर यांनीही त्यांच्या कामाची मुक्त कंठाने स्तुती केली आहे. कारण पाटबंधारे प्रकल्पा मधील लाभार्थीसाठी पाणी वाटपाची सविस्तर योजना आखून ती यशस्वीरित्या राबविली ती आजही भारतभर बिन धिक्कत राबविली जात आहे. सरांचे आणखी एक वैशिष्ट नमूद करावे वाटते की लॉर्ड मोर्ले यांच्या विनंतीवरून ते लंडन येथे गेले तेथे त्यानी लंडन शहरातील पाणी पुरवठा योजनेचा सखोल आराखडा तयार करून तेथील पाणी पुरवठ्याचा किचकट प्रश्न सहजतेने सोडवून यशस्वी रित्या कार्यान्वीत करून दाखविला. तसेच हैद्राबादचे निझाम यानी मुसा नदीच्या पुरा पासून होणाऱ्या उपद्रव याचा प्रश्न सोडवला, त्यामुळे शहरातील अनेक नागरिकांना पुराच्या संकटापासून यशस्वी मुक्तता मिळाली.

अशा महान कर्तबगार पुरुषाची प्राणज्योत १४ एप्रिल १९६२ रोजी मावळली. तेव्हा संपूर्ण देश त्यांच्या जाण्याने मनातून हळहळला.

असे उत्तुंग व्यक्तीमत्व असलेल्या व्यक्तीचा प्रत्येक अभियंत्याने धडा घेवून आपल्या कृतीतून उतरवून दाखविल्यास देशाच्या, राष्ट्राच्या, शहराच्या, ग्रामीण भागाचा विकास झाल्या शिवाय राहणार नाही. इतकेच !

# आधुनिक भारताचे शिल्पकार आणि तंत्रज्ञानाची नवी क्षितिजे


**ज्योतिर्मय साहित्य**

आजचे जग वेगाने अत्यंत वेगाने बदलत आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत, आपण ज्या ज्या सोयी सुविधा, साधने यांचा वापर करतो, त्या प्रत्येक गोष्टीमागे एका अभियंत्याची बुद्धी,कष्ट, मेहनत लपलेली असते.

आपण राहतो ते घर, प्रवासाचे रस्ते, पूल, विविध वाहने, हातातील स्मार्टफोन, इंटरनेट आणि अंतराळात झेप घेणारी रॉकेट्स आदी हे सर्व अभियंत्यांच्या कल्पकतेचे आविष्कार आहेत. आपल्या देशात दरवर्षी १५ सप्टेंबर अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो.

भारताचे महान सुपुत्र, आणि थोर अभियंते, विश्वविख्यात वास्तुविशारद, भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा १५ हा जन्मदिवस आहे. त्यांच्या कार्याचा उचित गौरव म्हणून त्यांच्या जन्म दिनानिमित्त आजचा दिवस, अभियंता दिन म्हणून साजऱ्या केल्या जातो.

त्यांचा जन्म १५ सप्टेंबर १८६० मध्ये कर्नाटक मधील एका सामान्य कुटुंबात झाला. त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर केवळ भारतातच नव्हे, तर जगभरात आपल्या कामाचा जबरदस्त ठसा, त्यांनी उमटवला. त्यांच्या कौशल्याची अनेक उदाहरणे आजही आपल्याला थक्क करतात.






पुण्याच्या खडकवासला धरणासाठी त्यांनी तयार केलेली स्वयंचलित पूर नियंत्रण दरवाजांची यंत्रणा आजही अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना मानली जाते.

म्हैसूरमधील कावेरी नदीवर बांधलेले कृष्णराज सागर हे त्यांनी बांधलेले धरण म्हणजे त्या काळातील आशियातील एक आशियाई आश्चर्यच होते. यामुळे हजारो एकर कोरडी जमीन सुजलाम सुफलाम झाली.

म्हैसूर संस्थानाचे दिवाण असताना त्यांनी औद्योगिकीकरण करा किंवा नष्ट व्हा, हा प्रसिद्ध नारा दिला होता. त्यांनी शिक्षण, बँक आणि उद्योग क्षेत्राची पाळेमुळे मजबूत केली. त्यांच्या याच अमूल्य योगदानासाठी १९५५ मध्ये त्यांना भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विटा-मातीच्या बांधकामापासून ते आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतचा काळ बदलला, तशी अभियांत्रिकीची व्याख्याही बदलत चालली आहे.

पूर्वी इंजिनिअरिंग म्हटले की सिव्हिल, मेकॅनिकल किंवा इलेक्ट्रिकल या क्षेत्रांचा विचार व्हायचा. पण आज २१ व्या शतकात अभियंत्यांनी डिजिटल विश्वाचा ताबा घेतला आहे. आजचा अभियंता केवळ सिमेंट-काँक्रीटचे पूल बांधत नाही, तर तो माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, रोबोटिक्स आणि बायो-टेक्नॉलॉजी, अशी विषयात, विविध माध्यमातून मानवी जीवनाला नवी दिशा देत आहे. भारताचे आयटी अभियंते आज सिलिकॉन व्हॅलीपासून ते जगाच्या कानाकोपऱ्यात अव्वल पदांवर कार्यरत असून देशाचे नाव उंचावत आहेत.

वर्तमानपत्र आणि माध्यमांमधून नेहमीच अभियंत्यांच्या रोजगारावर आणि कौशल्यांवर चर्चा होत असते. आजच्या घडीला अभियंत्यांसमोर केवळ पदवी मिळवण्याचे नव्हे, तर वाढत्या आणि बदलत्या हवामान बदलाशी लढा देण्याचे मोठे आव्हान आहे.

आज देशाला, अशा अभियंत्यांची गरज आहे, जे पर्यावरणपूरक तंत्रज्ञान विकसित करतील. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि हायड्रोजन इंधनाचा वापर वाढवून प्रदूषण कमी करणे हे आजच्या पिढीचे मुख्य ध्येय असायला हवे. कोणत्याही देशाचे भविष्य हे तिथल्या प्रयोगशाळांमध्ये आणि अभियंत्यांच्या रेखाटन बोर्डवर ठरत असते.

सर एम. विश्वेश्वरय्या यांनी आयुष्यभर काही तत्वे पाळली. वेळेचे नियोजन, कामातील अचूकता आणि देशप्रेम.


आजच्या तरुण अभियंत्यांसाठी मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या सर दीपस्तंभ आहेत. आज या अभियंता दिनी देशाच्या नवनिर्माणात रात्रंदिवस झटणाऱ्या प्रत्येक हाताचे आभार मानूया आणि त्यांच्या कल्पकतेला प्रणाम आणि त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन, आणि विश्वातील साऱ्या अभियंत्यांना खूप शुभेच्छा!


# उन्नती सोशल फाउंडेशनतर्फे ऐच्छिक दान गणेश मुर्तींचे वाटप

**ज्योतिर्मय साहित्य**



पुणे – सालाबादप्रमाणे यंदाही पिंपळे सौदागर येथील पहिले महिला गणेश मंडळ आणि उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने “ ऐच्छिक दान गणेश मुर्ती वाटप “ या उपक्रमात परिसरातील रहिवाशांना एक हजार गणेश मुर्तींचे वाटप करण्यात आले. या व्यतिरिक्त सार्वजनिक गणेश मंडळांनाही मुर्त्यां देण्यात आल्या. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे गणेश उत्सवाच्या आधी पाच प्रकारच्या गणेश मुर्तींमधून एका मुर्तीची निवड करण्याचा पर्याय रहिवाशांना उपलब्ध करुन त्यानुसार बुकींगची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. त्यानंतर श्री गणेश उत्सवाच्या आदल्या दिवशीपासून पेणवरुन मागवलेल्या शाडू मातीच्या गणेशमुर्तींचे बुकींगनुसार वाटप केले जाते. यंदा या उपक्रमाचा शुभारंभ आमदार शंकर जगताप, पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, प्रभागातील नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे, नगरसेविका अनिता काटे, सामाजिक कार्यकर्ते उद्योजक संदिप काटे, जयनाथ काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी रहिवाशांकडून ऐच्छिक स्वरुपात दानात जमा झालेली रक्कम दिव्यांग विवाह सोहळ्याच्या मदतीसाठी वापरली जाते. सामाजिक आणि सांस्कृतिक बांधिलकीची जाण ठेऊन पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा व्हावा या हेतूने दरवर्षी उन्नती सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे पिंपरी चिंचवड महापालिका विधी समिती सदस्या तथा नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे आणि उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे यांनी सांगितले. या उपक्रमात ऑल सिनियर सिटीझन असोसिएशन, आनंद हास्य योगा क्लबचे पदाधिकारी तसेच सदस्य यांचा गणेशमुर्ती वाटप कार्यक्रमात सहकार्य लाभते.





## जात्यावरच्या ओव्या......

अरे बरस पावसा
होवू दे बरसात
शेतकऱ्यांची कमाई
जाते सगळ्या पोटात ||८४||


अरे बरस पावसा
पड पड वारेमाप
भरू दे नदी तळे
सांडू दे आपोआप ||८४५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७२

ज्योतिर्मय साहित्य

समर्थ श्रीरामस्तुती करताना म्हणतात,'' संसारसंगे बहू शीणलों मी, कृपा करी रे रघुराज स्वामी.'' संसार हा आपला महाशत्रू आहे हे लक्षात घेऊन वागणाऱ्याला संसार बाधत नाही. तो संसारात असतो पण साक्षीभावाने प्रपंचाकडे पाहतो. हे सगळे प्रारब्धाचे खेळ आहेत हे तो जाणून असतो. सर्वसामान्यांना तो संसारात रमलेला दिसेलही पण त्याचे चित्त भगवंताकडे असते. आपण बसने किंवा रेल्वेने प्रवास करीत असतो. काहीवेळा सोबत असलेल्या सहप्रवाशांशी आपल्या छान गप्पा होतात. पण आपले स्टेशन आले की आपल्याला उतरावे लागणार हे आपण जाणून असतो. त्यामुळे त्या सहप्रवाशाना सोडून जाताना विशेष दुःख होत नाही. असेच आपण संसारातही असावे. पाण्यात राहूनही चिखलापासून अलिप्त असणाऱ्या कमलदलांप्रमाणे ! हे सगळे सांगणे सोपे पण आचरणे कठीण आहे. पण रामनाम घ्यायला तर सुरुवात करू या. तेव्हा हे मना, अधिक वेळ दवडू नकोस. प्रभात समयापासून भगवंताचे चिंतन कर असेच समर्थ आपल्याला या श्लोकातून सांगू इच्छितात.




स्वसंवाद : १. ज्या ऐहिक सुखांसाठी आणि पैशासाठी मी रात्रं-दिवस देह झिजवतो, ते सुख मला कधी चिरंतन शांतता देऊ शकेल का?

२. नामस्मरणासाठी पैशांचा खर्च नाही आणि देहाला कष्टही नाहीत, तरीही मी ते टाळण्यासाठी वेळेचे किंवा थकव्याचे निमित्त शोधतो का?

३. संसारातील नाती आणि कर्तव्यांमध्ये मी इतका गुरफटलो आहे का, की मला या सगळ्याकडे साक्षीभावाने किंवा अलिप्तपणे पाहता येत नाहीये?

४. पाण्यात राहूनही चिखलापासून अलिप्त राहणाऱ्या कमळाप्रमाणे, मी संसारात राहूनही माझे चित्त भगवंतचरणी ठेवण्याचा प्रयत्न करतो का?



(क्रमशः)




## ॥ संजय उवाच... ॥




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ मन

मन हे अत्यंत संवेदनशील असते, घडणाऱ्या प्रत्येक चांगल्या-वाईट गोष्टीचा परिणाम मनावर होतो, म्हणून मन शुद्ध व पवित्र असावे म्हणजे कोणत्याही गोष्टीचा त्रास होत नाही. ऐकावे जनाचे व करावे मनाचे हे नेहमी लक्षात ठेवा.

## नामाचे सूक्ष्म स्वरूप



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतः च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

### गर्भ उपनिषद

अहो दुःखाच्या समुद्रात पडलेल्या मला तरणोपाय दिसत नाही. आपल्या मागील जन्मात मी आपल्या परिवारासाठी जी शुभ,अशुभ कर्मे केली, ती आठवुण मी आज एकटा येथे जळतो आहे. ज्यांच्यासाठी मी कर्म केली, ते तर त्याचे फळ भोगून निघून गेले. जर मी या गर्भातून बाहेर पडलो तर मी सांख्य योग किंवा योगाच्या आश्रय घेणार आहे. त्यानंतर तो योनीद्वारात पोहोचतो आणि योनीरूपी यंत्रात दाबल्या जाऊन, अत्यंत मोठ्या कष्टाने जन्म घेतो. पण जन्मताच वैष्णवी वायूच्या स्पर्शा मुळे त्याला आता मागील जन्म मरण आठवत नाहीत. आधुनिक वैद्यक शास्त्र म्हणते की गर्भातील जीवाला परिपक्व झाल्यानंतर केवळ स्पर्श ज्ञान कळते. त्याच्या बुद्धीचा विकास आणखी होण्याच्या मार्गावर असतो. स्व जाणीवपूर्वक विचार प्रक्रिया गर्भात विकसित असल्याचा सिद्ध करणारा वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे गर्भातील जीव असा विचार करू शकत असेल, असे आज तरी वैद्यकशास्त्र सांगत नाही. गर्भाला मन आहे का नाही, हे विज्ञान ठामपणे सांगत नाही. स्व जाणीव संकल्प पूर्वक विचार तर्क शक्ती आणि मानसिक अनुभव यांचे अस्तित्व गर्भात कधी आणि कितपत सुरू होते याबाबत ही विज्ञान निश्चित उत्तर देत नाही. कुणी सांगावे ? (क्रमशः)




### शारीरिक, मानसिक व वृद्ध यावर मात करा

मित्रांनो आणि वाचकहो आज मी तुम्हाला "वय" वा वृद्धत्व यावर काही ऊपयुक्त टीप देतो. हे तर सर्वमान्य असेल की, आपलं वय वाढतच असतं. म्हणजे बालपण तरूणपण मग सून जावयी च्या काळात आपण वयस्कर होतो. पण इथच मित्रांनो, मला सर्वांना एक सल्ला देऊ ईच्छितो. आज माझे वय 72 आहे. पण मी सक्रिय असतो. वय झाले तरी आपण असंख्य जणाला पाहतो की, वय झाले म्हणून नातेवाईक मित्र यांच्याशी व्हाट्सवर गप्पा छाटीत बसणारे किंवा लेकी सुनाच्या संसारा मधे कारण नसताना लुडबुड करणारे, वेळ गमावणारे घरोघरी आहेत. खर तर वय हा सर्जनशीलतेत आपण मोठा अडथळा मानतो, तेच चूक आहे! ही वर्षे आपण अक्षरशः वाया घालवतो. मी अनेक जवान व मिलिट्री रिटायर नंतर कार्यरत आहेत हे पाहिले. वाचकहो, माणसाची बुद्धी व शोधवृत्ती किंवा वयानुसार कामाला मर्यादा नाही. जेव्हा अवयव साथ सोडतात, दृष्टी अंधारते वा वयोमानाने शरीर थकते, तरी मानवी मेंदू व जिद्द नव शोधाना जन्म देते. हा आपला माणसाचा अचाट नै. गुणधर्म आहे. हे ईतिहास मधील अंध, अपंग किंवा वृध्द लोकांनी काय साध्य केले आणि जग बदलविले याची अनेक ऊदा.देता येतील. वैद्यकीय विद्दनान शोध साहित्य गायन करण्यासाठी माणसिक जिद्द, निरीक्षणशक्ती व कल्पकता अधिक महत्त्वाची! म्हणून आपण वृद्ध झालो, वयोस्कर झालो तरी व्यायाम आसनासह इतर कामे करत रहा. स्वस्थ रहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा. सुप्रभात.



## जेवणानंतर कोथिंबीर चावून खाल्ल्याने पचन सुधारते

ज्योतिर्मय साहित्य

मूतखडय़ाची तक्रार असणाऱ्यांनी माठाचा वापर टाळलेला बरा. तांबडा माठ हा गुणांनी श्रेष्ठ आहे. रक्तवर्धक म्हणून माठाची पालेभाजी जरूर वापरावी.

मुळा : कच्चा मुळा, पक्का मुळा, वाळलेला मुळा व डिंगऱ्या किंवा त्याच्या शेंगा असे मुळ्याचे चार प्रकार वापरात आहेत. कच्चा मुळा जास्त औषधी आहे. मलमूत्रप्रवृत्ती साफ करतो. दीपक, पाचक, त्रिदोषहारक आहे. मूतखडा विकारात मुळ्याच्या पाल्याचा रस दीर्घकाळ घ्यावा. मूतखडा विरघळतो किंवा त्याचे बारीक बारीक कण होतात. पांथरी वाढली असता कोवळा मुळा भरपूर खावा. मुळा तापामध्ये पथ्यकर आहे. त्यामुळे अग्निमांद्य दूर होऊन तापाचे कारण नाहीसे होते. कोवळ्या मुळ्यांच्या पानांचा जास्त औषधी उपयोग होतो. पक्व मुळा हा रूक्ष, उष्ण, पचायला जड व शारीरिक कष्ट करण्याकरिता उपयुक्त आहे. मूळव्याध, पोटातील कृमी, पक्वाशयात वायू धरणे, याकरिता पोसलेला मुळा मीठ लावून खावा. अजीर्ण, अपचन दूर होते. सुकलेला मुळा पचावयास हलका व कफ वात विकारात उपयुक्त आहे. वाळलेल्या मुळ्याचे चूर्ण विषावर उत्तम उतारा आहे. डिंगरी किंवा मुळ्याच्या शेंगा वातनाशक, गुणाने उष्ण पण उत्तम पाचक आहेत. मुळ्याचे बी लघवी व शौचास व्यवस्थित होण्याकरिता उपयुक्त आहे. मूतखडा मोडण्याकरिता मुळ्याच्या बियांचे चूर्ण खावे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

डिंगऱ्या : जून मुळ्याच्या शेंगा औषधी गुणाच्या आहेत. डिंगऱ्या मलावष्टंभक, तीक्ष्ण व गुरू गुणाच्या आहेत. बियांचा लेप गंडमाळा, दडस गावी, अर्बुद, शिबे या विकारात बाह्योपचारार्थ उपयुक्त आहे. मूतखडा, कष्टसाध्य गाठी, जुनाट सूज या विकारात डिंगऱ्यांची भाजीने फरक पडतो.

मेथी : मेथी हे मधुमेहींना वरदान आहेच. चवीच्या दृष्टीने पालेभाज्यांत मेथीचे महत्त्व फार मोठे आहे. मधुमेहाच्या प्राथमिक अवस्थेत मेथीची भाजी नियमित खाल्ली तर मेथीपूड मिसळून गव्हाची पोळी खाण्याची पाळी येत नाही. मेथीची पालेभाजी खाल्ल्यामुळे लघवीचा वर्ण सुधारतो. भूक सुधारते, पाचक स्राव वाढतात. बाह्येपचार म्हणून मेथी पालेभाजीचा लेप दुखणाऱ्या सांध्यावर करावा. दुःख कमी होते. केस गळणे, कोंडा, केस निर्जीव होणे याकरिता मेथीच्या रसाने केस धुवावे.

राजगिरा : राजगिरा बियांचा वापर आहेच. राजगिरा पालेभाजी रक्तशुद्धीकरिता फार उपयुक्त आहे. गंडमाळा, क्षय, लघवीची जळजळ या विकारांत पालेभाजी किंवा त्या पानांचा वाटून लेप करावा. शरीरस्वास्थाकरिता लागणारी द्रव्ये राजगिरा पाने व बिया या दोन्हीही आहेत. (क्रमशः)

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### हरितालिका व्रत

वाळूचा शिवलींग करुन
पूजा करु मनोभावे
उचित वर मिळावा
हरितालिका व्रत उपवास
आज सखीसवे करताना
भाग्योदय सर्वांचा व्हावा

उपवास करुन खरी
मनोभावे करावी आज
सर्वांनी महादेवाची आराधना
हरितालिका व्रत कथा
एकमेकांना सांगून करु
सुखाची मनी कामना

# घडलेल्या चुकांचे संपूर्ण क्षालण होण्यासाठी उपाकर्म श्रावणी हवन करावे - सामवेदाचार्य वेदमूर्ती श्रीकृष्ण पळसकर गुरूजी

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर / संजय व्यापारी - समस्त सामवेदीय ब्राह्मण बांधवांना कळविण्यात अत्यंत आनंद होल आहे की, आपण संध्यावंदन करताना ज्या गोत्राचा, ज्या शाखेचा उच्चार करतो त्या स्वशाखेचे उपाकर्म करणे व त्याच गृह्यसूत्रानुसार आपले सर्व नित्यकर्म करत राहणे, हे आपले आद्य वर्तव्य आहे.

कालाच्या ओघात वेदांच्या ज्या शाखा लुप्त होत होत्या, त्यांचे जतन करणे हे खूप कष्टप्रद होते. परंतु, अत्यंत अडचणींमधूनही आपल्या काही गुरुजनानी सामवेदाच्या राणायनी शाखेचे संरक्षण करून, आज ती आपल्यापर्यंत सुरक्षित ठेवली आहे. त्या गुरुजींचे आशीर्वाद सर्वांनी घेतले.

तसेच, अत्यंत भाग्याने आपण मूलतः त्या राणायनी शाखेचे आहोत, परंतु त्याच शाखेप्रमाणे स्वतःचे नित्यकर्म करणे सर्वांना नित्य शक्य होत नाही... याच हेतूने या वर्षी सामवेदीय उपाकर्म व श्रावणी संस्कार हा आयोजित केला होता या कार्यक्रमाचा आज अनेक सामवेदीय ब्राह्मण बांधवांना लाभ झाला.

या कार्यक्रमासाठी सामवेदाचार्य वेदमूर्ती श्रीकृष्ण पळसकर गुरूजी यांनी पौरोहित्य केले व या कार्यक्रमाचे आयोजन श्री अनंतराव देशमुख यांनी केले व श्री अक्षय जोशी गुरुजी (प्रथानाध्यापक)

श्री शारदाम्बा वेदविधा गुरुकुलम् (सामवेद राणायनी शाखा) ह व त्यांचे सर्व शाखेतील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते. हा कार्यक्रम छत्रपती संभाजी नगर येथील बीड बायपास परिसरात श्री विनायकराव कुलकर्णी यांचे निवासस्थानी संपन्न झाला.

सामवेदाचार्य वेदमूर्ती श्रीकृष्ण पळसकर गुरूजी यांनी यावेळी श्रावणी उपाकर्म का करावे याबद्दल विस्तृत माहिती देताना सांगितले आपल्या संपूर्ण हिंदू धर्माचे संरक्षण आणि संवर्धन या सर्व गोष्टीचा संगोपण होण्याकरता आपल्याला आपल्या संस्कृतीने जो धर्माचा अभिमान सांगितलेला आहे त्या संरक्षणाचं आपले सण आपले उत्सव त्याच्या मर्यादा त्याच्या पाठीमागे संपूर्ण विवाह आणि आधुनिक विद्या हे आपल्या ऋषींनी आपल्या पूर्वजांनी आपल्याला सुरुवातीला सांगितलेला आहे आणि आपल्याकडून कळत नकळत घडलेली जी पाप असतात कळत नकळत अज्ञान आणि जी घडलेल्या चुका असतात त्यातच संपूर्ण क्षालण व पापाचं संहार होण्यासाठी हा उपाकर्म श्रवणी प्रयोग आपल्याला सांगितलेला आहे हा विषय याला श्रावणी असं म्हणतात हा विधी सामवेदी जे लोक आहेत त्यांनी याचं दिवशी करायला विशेषत्वांनी सांगितलेला आहे. तो आपल्या संभाजीनगर मध्ये सामवेदी लोक जे आहे आज दीडशे वर्षांपूर्वी २०० वर्षांपूर्वी अनेक लोक आपल्या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये होते पण झाडाच्या उन्हामध्ये या वेदाचे पठण करणारी लोक लुप्त झाले पण आपल्या मराठवाड्यातील आपल्या सर्वांचे आदरणीय असलेले जालना जिल्ह्यामध्ये चतुर्वेदेश्वर धाम असे संस्थान आहे आणि त्यांचे संस्थापक महामुखांच्या श्री सिद्धेश्वर शास्त्री कस्तुरे यांनी चारही वेदाची तिथे स्थापना केली आणि त्याच्यानंतर या वेदाचा संरक्षण संवर्धन व्हावं, आपल्या भारतीय संस्कृतीचा संरक्षण व्हावं म्हणून त्यांनी कर्नाटकामध्ये या प्रत्येक वेदाचा सामवेदाचा अभ्यास करण्याकरता दोन विद्यार्थी आणि आश्रम वेदाचा अध्ययन करण्याकरता दोन विद्यार्थी असे तिथे पाठवून ती अध्ययन परंपरा आपल्या महाराष्ट्रामध्ये आणली आणि आज आपल्याला लोकप्रिय झालेल्या या सामवेद शाखेतील त्या लोकांना आपण जागृत केलं आणि आज मला आनंद वाटतो की संभाजीनगर मध्ये आज एवढी मंडळीची सर्व सामवेदीसाठी जी मंडळी आपल्याला येथे मिळते आहेत आज यांचा यांना या वेदाचे ज्ञान देणारे कोणी नव्हतं आणि हे लुप्त झालेली परंपरा पुनर्जीवित होण्यासाठी अनंतराव सारख्यांनी अक्षय गुरुजींच्यासारख्यांनी हा एक उपक्रम केला आणि मला फोन केला की गुरुजी तुम्ही हा विधी सांगण्याकरता यावं म्हणून मी या ठिकाणी आलो. त्याच्यामध्ये आजच्या दिवशी या सर्व मंडळींनी हे आपलं यज्ञोपवित जे आहे ते का धारण करायचं? का आपण हातामध्ये बांगड्या घालायच्या? याच्या सगळ्यांच्या मागे आपल्याला आपल्या संस्कृतीने व्यापक अर्थ सांगितला आहे उदाहरण देतो की आपल्या संस्कृतीचे महत्त्व किती आहे. आपल्या संस्थेचे महत्त्व अस आहे की एकदा जपानमधून तिथले पंतप्रधान आपले आदरणीय पंतप्रधान असलेले नरेंद्र मोदीजी यांना भेटायला काशीला आले व काशीला त्यांची चर्चा झाली संपूर्ण राष्ट्रांमध्ये जर विचार केला तर जपानमध्ये सर्वात जास्त भूकंप होतात आणि आमचे जे वेद आहेत यांच्यामध्ये याचा परिहार आहे त्यासाठी त्यांनी एक कमिटी स्थापन केली आणि भारतातील ज्या ज्या वेदातील अग्रगणनेने विद्वान लोकांना एकत्रित केलं आणि ती एक समिती स्थापन करून १२० लोकांना इथून जपान मध्ये नेलं (त्या समितीमध्ये मी होतो) त्या लोकांच्याकडे जबाबदारी दिली की मी तर त्यांना शब्द दिला की आपली एवढी मोठी संस्कृती आहे आता हे तुमचं काम आहे की मला तुम्ही त्याच्यातून सगळे उपाय निवडून मला सांगा या वेदांमुळे काय होऊ शकते. मग आम्ही लोकांनी जपानला जाऊन त्या लोकांना आपल्या भारतीय संस्कृतीचं काय महत्त्व आहे, वेदांच काय महत्त्व आहे ती संस्कृती आपल्याला काय सांगते त्यातले विधान काय सांगतात या सगळ्या मंत्रोच्चाराने काय होऊ शकतो, ती सगळी ओळखून काढली आणि त्या त्याप्रमाणे वेदांनी जसं सांगितलेलं आहे आणि झालं काय या ठिकाणी आपलं भारतीय म्हणजे मोदीजींचे मंडळ आमच्या सोबत होत ज्या लोकांनी सुद्धा आपण त्यांना आव्हान दिलं होतं की तुम्ही सगळे आधुनिक यंत्रणा लावा की आमच्या मंत्रानी या संपूर्ण तुमच्या परिसरामध्ये बदल होतो की नाही तर त्याचा रिपोर्ट असा आलेला आहे की आपल्या केलेल्या अनुष्ठानानी त्यांना जवळजवळ ९०% त्यांचे फायदा झाला आहे पूर्वी कधी आमच्या नुकसान होत होतं त्याच्या पटीमध्ये खूपच कमी नुकसान झाले व आपण त्यांना सांगितलंकी याची जी व्यापकता आहे हे जर तुम्हाला संपूर्ण वाढवावा लागेल म्हणून आपल्या पूर्वीच्या काळामध्ये घराघरांमध्ये आणि संपूर्ण गावागावाचे अग्निहोत्री लोक असायचे संपूर्ण एका गावामध्ये एक अग्निहोत्री असेल तर एका गावाचा संरक्षण करायचं काय तर ही जी सेवा हे ब्राम्हण लोक अग्निहोत्री मंडळी कशासाठी करायची स्वतःच्या स्वार्थासाठी नाही विश्वाच्या कल्याणाकडे ही संकल्पना होण्यासाठी आज आपले आदरणीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी खूप प्रकल्प उभे केलेले आहे त्याच्याबद्दल एक प्रकल्प म्हणजे आम्ही जो हाती घेतलेला आहे ती गो संरक्षण संपूर्ण भारतामध्ये आता सगळ्यात जास्त गाय हे आपल्याकडे असुरक्षित आहे

आपण तिला गोमाता म्हणतो पण तिचा संरक्षण ती दुभती आहे तोपर्यंत आपण घेतो, नंतर भाकड गाईचं कोणी संरक्षण करीत नाही त्यामुळे एक मोठा प्रकल्प आम्ही हातात घेतलेला आहे त्याचाही गोसंवर्धन प्रकल्प संबंध चालू आहे तर असे अनेक प्रकल्प आपल्या आदरणीय मोदींच्या हाताने होत आहेत आणि आपण सर्वांनी त्यांना पाठिंबा द्यावा व त्यांच्या हातून हिंदू धर्माचे रक्षण करून घ्यावे एवढीच अपेक्षा.





# चुडाराम बल्हारपुरे यांच्या जत्रा घडली नागोबाची या लोकनाट्यास साताराचा पुरस्कार जाहीर

**ज्योतिर्मय साहित्य**

गडचिरोली - स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट, डाकेवाडी (जि. सातारा) या संस्थेतर्फे दरवर्षी मराठी साहित्यिकांसाठी उत्कृष्ट वाङ्.मय स्पर्धा घेण्यात येते. व पुरस्कारप्राप्त साहित्यिकांना स्पंदनच्या वार्षिक साहित्य संमेलनात उत्कृष्ट साहित्यिक पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. राष्ट्रीय स्तरावर अत्यंत मानाचा समजला जाणाऱ्या या पुरस्काराकरीता मराठी साहित्य प्रकारात झाडीपट्टीतील नाटककार चुडाराम बल्हारपुरे यांच्या मधुश्री पुणे प्रकाशित जत्रा घडली नागोबाची या लोकनाट्यास यंदाचे नाट्यलेखनाचे स्व. राजाराम डाकवे (तात्या) साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष व संस्थापक डॉ. संदीप डाकवे, उपाध्यक्ष आप्पासाहेब निवडूंगे व सचिव सौ. रेश्मा डाकवे यांनी कळविले असून सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील, मौजा-डाकेवाडी (काळगाव), येथे दि. २८ सप्टेंबर २०२६, सोमवारी स. ११.०० वा. होणाऱ्या साहित्य संमेलनात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, सन्मानचिन्ह, सन्मान वस्त्र, व सन्मानपत्र असे आहे.

विशेष म्हणजे या नाटकास यापूर्वी साहित्य विहार संस्था, नागपूर यांचा डॉ. प्रज्ञा निनावे पुरस्कृत उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्कार-२०२५, (२) अ.भा. मातोश्री जिजाऊ परिवर्तन सामाजिक शिक्षण संस्था, गोंदिया यांचे नटसम्राट पुरस्कार -२०२६, (३) यशदा पुणे, संवाद पुणे, पुणे महानगर पालिका, व मराठी भाषा संवर्धन समिती, पुणे यांचे उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कार - २०२६.(४) शिवांजली साहित्यपीठ, चाळकवाडी (ता. जुन्नर, जि.पुणे) यांचा स्व. सयाजी चाळक स्मृती उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्कार-२०२६ व (५) महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा-दामाजीनगर यांचा शहिद राजकुमार ठोंबरे स्मृती उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्कार-२०२६ असे पाच पुरस्कार प्राप्त झाले असून हा सहावा पुरस्कार आहे.

चुडाराम बल्हारपुरे यांच्या या यशाबद्दल सत्यवान मंडलीक (साहित्यिक), प्रा. अरुण बुरे, योगेश गोहणे, यादव गव्हाणे, प्रा. डॉ. श्याम मोहरकर, प्रा. डॉ. जनबंधू मेश्राम, प्रा. डॉ. योगीराज नगराळे, नाट्यश्रीचे दादा चुधरी, दिलीप मेश्राम, राजेंद्र जरुरकर, डॉ. दिपक चौधरी, रमेश निखारे, मधुश्री प्रकाशनचे पराग लोणकर (प्रकाशक), व नाट्यश्रीच्या तसेच झाडीपट्टीच्मा कवी, साहित्यिक व कलावंतांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.




**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

## विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

### प्रत्येक दिवस ही नव्याने सुरुवात करण्याची संधी आहे

पुढे....

तुम्ही काल जिंकलात की हरलात, याचीही गरज नाही. फक्त एक गोष्ट हवी–

आज पुन्हा प्रयत्न करण्याची तयारी.

कारण सूर्य रोज उगवताना कालच्या अंधाराची माफी मागत नाही. तो फक्त पुन्हा प्रकाश देतो.

नदी काल दगडावर आदळली म्हणून वाहणं थांबवत नाही. ती मार्ग बदलते...

पण पुढे जाते. झाडाची पानं गळतात.

पण झाड जगणं थांबवत नाही.

पुन्हा ऋतू येतो...

आणि नवीन पालवी फुटते.

मग आपणच का कालच्या एका अपयशामुळे संपूर्ण आयुष्य थांबवायचं?

आजची सकाळ तुमच्यासाठी आली आहे.

तुमच्या हातात पुन्हा एक दिवस आहे. २४ तास. १,४४० मिनिटं. ८६,४०० सेकंद.

यातील एक क्षण तुमचं आयुष्य बदलण्यासाठी पुरेसा असू शकतो.

कदाचित आज तुम्ही एखाद्या जुन्या मित्राला फोन कराल. कदाचित आज तुम्ही एखादं स्वप्न पुन्हा सुरू कराल.

कदाचित आज तुम्ही माफी मागाल.

कदाचित आज तुम्ही स्वतःला माफ कराल.

आणि कदाचित... आजपासून तुमचं आयुष्य पुन्हा बदलायला सुरुवात होईल.

एक दिवस मागे वळून पाहताना तुम्हाला तो दिवस आठवेल...

ज्या दिवशी तुम्ही म्हणालात– "सगळं संपलं नाही... मी पुन्हा सुरू केलं."

आणि त्या एका निर्णयासाठी तुम्ही स्वतःचे आभार मानाल.

## अभावातून प्रभावाकडे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे. मो. 95030 45495



### विचारांच्या पलीकडे-साक्षीच्या प्रकाशात वर्तमान

पुढे....

म्हणून दुःख येते-जाते; जाणणारा राहतो.हीच साक्षीची पहिली झलक.

३. "मी मन नाही" – योगदृष्टी

पतंजली म्हणतात–

योगश्चित्तवृत्तिनिरोधः ।

तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् ॥

– योगसूत्र १.२–१.३

चित्ताच्या वृत्तींचा निरोध झाला की द्रष्टा आपल्या स्वरूपात स्थित होतो.

याचा अर्थ विचारांचा हिंसक नाश करणे असा नाही. तर विचार उठत आहेत, पण मी त्या विचारांना पाहू शकतो ही जाणीव जागी होणे.क्रोध आला.त्याच क्षणी "माझ्यात क्रोधाची वृत्ती उठली आहे."असे पाहता आले तर आपण क्रोधापासून एक पाऊल दूर आलो."मी क्रोध आहे" याऐवजी–"क्रोध माझ्या चित्तात उठलेली एक वृत्ती आहे."हा छोटासा फरक साधनेत फार मोठा आहे.

४. अतीताची साखळी

एखाद्याने आपल्याला दुखावले.घटना संपली.

पण मन त्या घटनेची स्मृती पुन्हा पुन्हा जागवते.

घटना एकदाच घडली;पण मन तिला शंभर वेळा जगते.

यालाच आधुनिक भाषेत मानसिक पुनरावृत्ती म्हणता येईल; परंतु भारतीय दर्शनात स्मृती आणि संस्कार या संकल्पनांनी याचे सूक्ष्म विश्लेषण केले आहे.

पतंजली म्हणतात–

अनुभूतविषयासंप्रमोषः स्मृतिः ॥

– योगसूत्र १.११

अनुभवलेल्या विषयाचे चित्तात टिकून राहणे म्हणजे स्मृती.

स्मृती दोष नाही.स्मृतीशी झालेली आपली ओळख आणि आसक्ती ही बंधनाची सुरुवात आहे.म्हणून भूतकाळ पुसायचा नाही.

त्याला त्याच्या जागी ठेवायचे."हे घडले होते" एवढे राहू द्यायचे; "हे अजूनही माझ्याबरोबर घडत आहे" असे मानायचे नाही.

५. भविष्याची चिंता

मनाला भविष्याबद्दल सतत काहीतरी निश्चित करायचे असते.

"उद्या काय होईल?""जर असे झाले तर?""जर तसे झाले तर?"

एक शक्यता दुसरी शक्यता निर्माण करते आणि मन कल्पनेचे अखंड विश्व उभे करते.

(क्रमशः)



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'बहीण-भाऊ' (अतूट विश्वासाचा रेशीमबंध)

"चिंधी बांधते द्रौपदी हरीच्या बोटाला..."

किंवा

"भरजरी ग पितांबर दिला फाडून,
द्रौपदीसी बंधू शोभे नारायण..."

इतिहासातील अशीच एक प्रसिद्ध आख्यायिका सांगितली जाते–

चित्तोडगडवर जेव्हा संकट ओढवले, तेव्हा मेवाडची राणी कर्णावती हिने मुघल बादशहा हुमायूनला राखी पाठवून मदतीची साद घातली होती. हुमायूननेही त्या राखीचा आणि मानलेल्या बहिणीच्या हाकेचा पूर्ण मान राखून तिच्या रक्षणासाठी तातडीने सैन्य घेऊन धाव घेतली होती.

जाती-धर्माच्या आणि रक्ताच्या सीमा ओलांडून केवळ एका पवित्र धाग्याने निर्माण केलेले हे विश्वासाचे नाते जगाच्या इतिहासात अजरामर झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनीही रयतेतील प्रत्येक माऊलीला बहिणीचा सन्मान देऊन या नात्याचे पावित्र्य अखंड जपले. हेच बहीण-भावाचे पवित्र नाते भारतीय मनामनात जर कायमस्वरूपी जागृत राहिले, तर आपल्या भगिनींवर होणारे अन्याय आणि अत्याचार कायमचे संपुष्टात आल्याशिवाय राहणार नाहीत!

आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात बहीण-भावाच्या प्रत्यक्ष भेटीगाठी कदाचित थोड्या कमी झाल्या असतील; पण मनातील ओलावा कधीच कमी होत नाही.

नात्यांच्या या भरजरी 'महावस्त्रा'चा हा बहीण-भावाचा पदर अथांग प्रेम, निस्वार्थ माया आणि विश्वासाची ऊब देतो. हा पदर जेवढ्या आदराने जपला जाईल, तेवढं आपलं आयुष्य अधिक सुंदर, सुसंस्कारी आणि समृद्ध राहील!

# हजारो मित्रांच्या गर्दीत तो एक लंगोटिया मित्र हरवला

ज्योतिर्मय साहित्य

मोबाईलच्या स्क्रीनवर वाढत गेलेल्या मैत्रीच्या गर्दीत मनापासून मनाशी जोडलेलं नातं कुठेतरी हरवत चाललंय लंगोटिया यार म्हणजे केवळ बालपणीचा मित्र नव्हे; तो आपल्या बालपणापासून तारुण्यापर्यंतच्या प्रवासाचा साक्षीदार असतो. आपल्या घरची परिस्थिती, आई-वडिलांची धडपड, आपल्या स्वप्नांची उंची, मनातील भीती, आवडी-निवडी, राग, हट्ट, कमतरता आणि कधी कुणाला न सांगितलेल्या गोष्टीही ज्याला माहीत असतात, तो म्हणजे लंगोटिया यार.

ज्याच्यासोबत बसण्यासाठी कारण लागत नाही, बोलण्यासाठी विषय लागत नाही आणि मन मोकळं करण्यासाठी शब्द शोधावे लागत नाहीत ज्याच्यासोबत असताना 'आपण एकटे नाही' ही भावना मनाला आधार देते, तोच खरा लंगोटिया मित्र.

त्याच्या घरी जाण्यासाठी निमंत्रणाची गरज नसते आणि आपल्या घरी तो आला तरी 'कशासाठी आलास?' असा प्रश्न नसतो. कधी भांडण होतं, दोन-चार दिवस बोलणं बंद होतं; पण मैत्री संपत नाही. कारण त्या नात्याचा पाया गैरसमज किंवा अहंकार नसतो, तर विश्वास असतो. त्या मैत्रीत कोण किती वेळा फोन केला, कोणाने मेसेजला रिप्लाय दिला किंवा कोणाने पोस्टला लाईक केलं, याचा हिशेब ठेवला जात नाही. त्या नात्याला 'ब्लॉक' करण्याचा पर्यायच नसतो.

पण आजच्या डिजिटल युगात असा लंगोटिया यार उरलाय तरी कुठे?

आज सोशल मीडियामुळे जग जवळ आलं आहे; मात्र या धावपळीच्या काळात माणूस माणसापासून दुरावत चालला आहे. हातातला मोबाईल आपल्याला जगाशी जोडतोय, पण त्याच वेळी आपल्या अगदी जवळच्या माणसांपासून नकळत दूरही नेत आहे.

हजारो मित्र, शेकडो ग्रुप, असंख्य फॉलोअर्स आणि क्षणाक्षणाला येणाऱ्या नोटिफिकेशन्सच्या या गर्दीत मन मात्र कधी कधी एकटं पडतं. आणि अशावेळी आठवतो तो एक खास मित्रलंगोटिया यार!

आज व्हाट्सअँप , फेसबुक , इंस्टाग्राम अशा माध्यमांतून आपण क्षणाक्षणाला अनेकांशी संवाद साधतो. नव्या ओळखी जोडतो, जुन्या मित्रांना शोधतो. कोणाचे हजारो मित्र असतात, तर कोणाचे लाखो फॉलोअर्स. एखाद्याच्या पोस्टला हजारो लाईक्स मिळतात आणि शुभेच्छांचा अक्षरशः पाऊस पडतो.

पण या सगळ्या गर्दीत एक प्रश्न मात्र मनाला अस्वस्थ करतो

आपल्याला खऱ्या अर्थाने समजून घेणारा किती जण आहे?

आपली व्यथा न सांगताही ओळखणारा कोण आहे? आपण शांत का आहोत, हे विचारणारा कोण आहे? आपण अडचणीत आहोत, हे आपल्या स्टेटसवर न लिहिताही जाणणारा कोण आहे?

कदाचित याच प्रश्नाचं उत्तर शोधताना जाणवतंमित्रांची संख्या वाढली; पण मित्रत्व कमी झालं.

पूर्वी मैत्री करण्यासाठी फ्रेंड रिक्वेस्ट पाठवावी लागत नव्हती. मित्र होण्यासाठी प्रोफाइल फोटो पाहावा लागत नव्हता. फॉलोअर्स किती आहेत,



हे मोजावं लागत नव्हतं. शाळेच्या मैदानावर, गावच्या पारावर, शेताच्या बांधावर, नदीकाठी किंवा घराच्या ओसरीवर मित्र भेटायचा आणि मैत्री आपोआप जुळायची.

''ए चल बाहेर ये!''

एवढ्या एका हाकेत दिवसाची मैत्री सुरू व्हायची.




लपाछपी, सूरपारंब्या, विटीदांडू, पाट्या, क्रिकेट, कबड्डी, खो-खो हे केवळ खेळ नव्हते. त्या खेळांच्या निमित्ताने संवाद व्हायचा, मैत्री वाढायची, संघभावना निर्माण व्हायची. कधी भांडणं व्हायची आणि काही क्षणांत पुन्हा गळ्यात गळे पडून मैत्रीही व्हायची.

आज त्या जागी मोबाईलच्या स्क्रीनने प्रवेश केला आहे. मैदानाची जागा स्क्रीनने घेतली आणि खेळाची जागा मोबाईलमधल्या गेम्सने.

पूर्वी दोन मित्र जवळजवळ बसले की संवाद व्हायचा. आज दोन मित्र शेजारी बसलेले असतात; पण दोघांचेही डोळे मोबाईलच्या स्क्रीनवर असतात.

ना मनमोकळ्या गप्पा ना विचारांची देवाणघेवाण ना चेहऱ्यावरचे भाव वाचण्याची सवय फक्त स्क्रोल, लाईक, शेअर आणि पुन्हा स्क्रोल.

कामाच्या धावपळीनंतर थोडा वेळ मिळाला की मोबाईल हातात घेतला जातो. वेळ जातो; पण संवाद होत नाही. एखाद्या जुन्या मित्राला साधा फोन करून, ''काय रे, कसा आहेस?'' एवढं विचारण्याचीही उसंत उरत नाही.

सोशल मीडियावर मात्र आपण एकमेकांच्या आयुष्यात सतत उपस्थित असतो. वाढदिवसाला फोटो, मैत्री दिनाला पोस्ट, प्रवासात सेल्फी, प्रत्येक भेटीचे स्टेटस आणि त्यावर मोठमोठी विशेषणं''माझा भाऊ'', ''माझा जीव'', ''माझी जान'', ''कायम सोबत'', ''एकनिष्ठ'', ''आधारस्तंभ''

पण खरं सांगायचं तर मैत्रीची खरी परीक्षा स्टोरीवर होत नाही; ती संकटाच्या वेळी होते.

जेव्हा आयुष्यात सगळं सुरळीत असतं, तेव्हा आपल्या आजूबाजूला अनेक जण असतात. पण एखाद्या कठीण प्रसंगी फक्त एक फोन येतो

''कुठे आहेस? मी येतो.''

किंवा एखादा हात खांद्यावर येतो आणि आवाज म्हणतो

''घाबरू नकोस मी आहे ना!''

त्या चार शब्दांची किंमत हजारो लाईक्सपेक्षा मोठी असते.

स्क्रीनच्या पलीकडून मिळणारी सहानुभूती आणि आपल्या शेजारी बसून दिलेला धीर यात जमीन-अस्मानाचा फरक असतो. कारण स्क्रीनवरून आपण दुःख पाहू शकतो; पण जवळचा मित्र ते दुःख मनापासून अनुभवतो.

आज अनेक तरुण ताण, एकटेपणा, अपेक्षांचं ओझं, नात्यांमधील गुंतागुंत आणि भविष्याच्या अनिश्चिततेशी झुंजत आहेत. प्रत्येकाच्या मनात काही ना काही न बोललेलं असतं. अशावेळी गरज असते ती नेहमी मोठ्या सल्ल्याची नसते; कधी कधी फक्त कुणीतरी शांतपणे ऐकण्याची गरज असते.

''बोल मी ऐकतोय.''

इतकं म्हणणारा एखादा जिवलग मित्रही त्या क्षणी मोठा आधार ठरतो.

गंभीर मानसिक तणावाच्या परिस्थितीत समुपदेशन आणि व्यावसायिक मदत घेणं महत्त्वाचं आहेच; पण त्यासोबत माणसाने माणसाच्या जवळ राहणं, त्याचं बोलणं ऐकणं आणि त्याला एकटं न पडू देणंही तितकंच आवश्यक आहे.

मोबाईलने अंतर कमी केलं; पण संवाद कमी केला.

सोशल मीडियाने ओळखी वाढवल्या; पण जिव्हाळा कमी केला.

फ्रेंडलिस्ट मोठी केली; पण मनातली जागा मात्र रिकामी केली.

आज आपल्याकडे हजारो मित्र आहेत; पण रात्री उशिरा मन अस्वस्थ झालं, काहीतरी सांगावंसं वाटलं, डोळ्यांत पाणी आलं किंवा आयुष्याच्या एखाद्या वळणावर निर्णय घ्यायचा झाला, तर आपण खरंच कोणाला फोन करतो?

याच प्रश्नाचं उत्तर कदाचित आपल्याला आपल्या जुन्या दिवसांकडे घेऊन जातं.

त्या दिवसांकडे, जेव्हा मैत्रीला इंटरनेटची गरज नव्हती. मित्राच्या घरी जाण्यासाठी लोकेशन शेअर करावं लागत नव्हतं. भेटण्यासाठी 'ऑनलाईन' असण्याची अट नव्हती. मित्राची मनःस्थिती त्याच्या स्टेटसवरून नाही, तर त्याच्या चेहऱ्यावरून ओळखली जायची.

काळ बदलला, तंत्रज्ञान बदललं, जगण्याची पद्धत बदललीहे सगळं स्वीकारायलाच हवं. सोशल मीडिया वाईट आहे असंही म्हणता येणार नाही. त्याने जग जवळ आणलं, माहितीची दारं उघडली आणि दूर गेलेल्या माणसांना पुन्हा जोडण्याची संधी दिली.

प्रश्न तंत्रज्ञानाचा नाही; प्रश्न आहे आपण त्याचा वापर कसा करतो याचा.

हजारो ऑनलाईन मित्र असणं चुकीचं नाही. पण त्या हजारोंच्या गर्दीत एखादा असा मित्र जपला पाहिजे, ज्याच्यासमोर आपल्याला स्वतः ला सिद्ध करण्याची गरज नसते.

जो आपल्या यशात टाळ्या वाजवतोच; पण अपयशातही खांद्याला खांदा लावून उभा राहतो.

जो आपल्या आनंदाचा फोटो काढत नाही; तर आनंदात सहभागी होतो.

जो आपल्या दुःखावर कमेंट करत नाही; तर दारात येऊन उभा राहतो.

आणि म्हणूनच वाटतंआपल्या आयुष्यातील तो लंगोटिया मित्र हरवला असेल, तर त्याला शोधण्याची वेळ आली आहे.

एखाद्या दिवशी मुद्दाम मोबाईल बाजूला ठेवा.

फ्रेंडलिस्टमधल्या सर्वात लोकप्रिय मित्राला नाही, तर आपल्या आयुष्यातील सर्वात जुन्या मित्राला फोन करा.

फक्त एवढंच विचारा

''ए लंगोटिया कुठे आहेस रे?''

कदाचित त्या बाजूनेही काही क्षण शांतता असेल. कदाचित तोही तुमच्या फोनची वाट पाहत असेल.

भेटा त्याला. दोन कप चहा घ्या. जुन्या आठवणींना उजाळा द्या. बालपण पुन्हा जगता आलं नाही तरी काही क्षण त्याला स्पर्शून नक्कीच जाता येईल.

कदाचित त्या दोन कप चहामध्ये तुम्हाला तुमचं हरवलेलं बालपण पुन्हा सापडेल.

कारण लंगोटिया मित्राची जागा कोणताही 'ऑनलाईन फ्रेंड' घेऊ शकत नाही.

काही मैत्री फोटोमध्ये नसते
काही मैत्री स्टेटसमध्ये नसते
काही मैत्री लाईक्समध्ये नसते
ती असते मनात.

आणि मनात जपलेली अशी मैत्री कितीही वर्षं उलटली तरी जुनी होत नाही.

म्हणूनच आजच्या या धावपळीच्या आयुष्यात आपल्या त्या जुन्या मित्रांना पुन्हा एकदा आठवूया. ज्यांच्यासोबत आपण मोठे झालो, हसलो, भांडलो, रडलो आणि आयुष्याचे पहिले धडे शिकलो, त्या नात्यांना पुन्हा जिवंत करण्याचा प्रयत्न करूया.

कदाचित हजारो मित्रांच्या गर्दीत हरवलेला तो एक लंगोटिया मित्र अजूनही तुमची वाट पाहत असेल

ए लंगोटिया कुठे आहेस रे?

चल, पुन्हा एकदा भेटूया मोबाईल बाजूला ठेवून,

जुन्या दिवसांसारखं मनापासून गप्पा मारूया!




# ऋषिपंचमी : महिलांचा उत्सव

ज्योतिर्मय साहित्य

भाद्रपद महिन्यातील पंचमीला येणारा महिला वर्गाचा उत्सव म्हणजे ''ऋषीपंचमी'' होय. ऋषीपंचमी उत्सवात महिलांचाच सहभाग मोठ्या प्रमाणात असतो. या सणाच्या उत्सवाचे सर्व विधी महिलाच पार पाडण्यासाठी अग्रभागी असतात.

ऋषिपंचमी दिनी महिला भल्या पहाटे उठून गटागटाने एकत्र जमतात, प्रत्येक महिला पूर्व दिशेला आपला चेहरा करून बसतात, समोर पूर्व दिशेला लाकडी पाट ठेवतात. या पाटांवर तांदळाचे पुंजके (मूठभर तांदूळ) ठराविक अंतरावर ठेवतात.





या प्रत्येक पुंजक्यावर ऋषी-मुनी सर्वश्री कश्यप, भारद्वाज, विश्वमित्र, गौतम, जमदग्नी, वसिष्ठ व अत्री हे सात ऋषी यांच्या नावाने सुपाऱ्या ठेवतात, व शेवटच्या आठव्या पुंजक्यावर तपस्विनी अरुंधती यांची प्रतीके म्हणून सुपाऱ्या ठेवतात. ही सर्व मांडणी झाल्यावर महिला वर्ग मनोभावे फुले वाहून, अगरबत्ती लावून तसेच हळद, कुंकू वाहून पूजा करतात, व या सातही ऋषी आणि तपस्विनी यांना प्रार्थना करतात की,आमच्या परिवारात तुमच्या सारखे ज्ञानी, तपस्वी व तपस्विनी

जन्मास येऊ द्यात, आपल्या घराण्याचे घरपण टिकावे, घरण्याचा व कुटुंबाचा नाव लौकिक वाढावा, घराणे वैभवशाली व्हावे, यासाठी महिला मनोभावे पूजा करतात. असे म्हणतात की, या दिवशी बैलांच्या श्रमाने निर्माण झालेले व त्यांनी वाहून आणलेले कुठलेही धान्य किंवा भाज्या खात नाहीत.

असा हा ऋषिपंचमी उत्सव म्हणजे, भारतीय संस्कृती व मांगल्याचे महान प्रतीक होय. भारतीय महिलांनी भारतीय पारंपरिक उत्सव व सण साजरे करून भारतीय संस्कृती व संस्कारांची उजळणी करून समाजात चांगले विचार पेरावे अशी अपेक्षा आहे.



जैन पर्यूषण पर्व २०२६

बलराज संघई, 9420015108

## जैन पर्यूषण पर्व : दशलक्षण धर्म

भारतीय संस्कृतीमध्ये आध्यात्मिक आचार विचार प्रवृत्तींना महत्त्वाचे स्थान आहे. त्यानुसार भारतीय धर्म संप्रदायामध्ये अनेक प्रकारचे आध्यात्मिक पर्वकाळ येतात. जैन धर्मामध्ये प्रामुख्याने सर्वाधिक महत्त्वाचे पर्व _पर्यूषण पर्व_ हे मानले जाते.

दिगंबर जैन संप्रदायानुसार भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील ऋषिपंचमी ते भाद्रपद पौर्णिमा असा हा दहा दिवसांचा पर्व काळ असतो. या वर्षी तो दिनांक १६ ते २६ सप्टेंबर २०२६ असा आहे. आत्मधर्माच्या आचार आणि विचारासाठी हाच काळ उत्कृष्ट मानला गेला आहे. कारण आराधनेसाठी या काळात हवामान समशीतोष्ण असते. भारतीय संस्कृतीत नांदणाऱ्या सर्व धर्मामध्ये याच काळामध्ये अनेक प्रकारची व्रतं केली जातात. यामध्ये आत्मसमृद्धीच्या दृष्टीने आत्म्याच्या स्वभावाचा विचार केला जातो. जैन धर्मानुसार आत्म्याचे दहा प्रमुख स्वभाव लक्षण विश्लेषित केले आहेत. म्हणून या पर्व काळाला दशलक्षण धर्म असे ही म्हटले जाते. धर्म म्हणजे पदार्थाचा मूळ स्वभाव. जगातील सर्व पदार्थ आपला स्वभाव कधीही सोडत नाहीत. आत्म्याच्या सर्वोत्कृष्ट स्वरूपातील प्राप्तीसाठी त्याचे मूळ लक्षण स्वभाव जाणणे आवश्यक ठरते.

आत्म्याच्या मूळ दहा स्वभाव लक्षणांचा विचार आणि त्या नुसार आचार यात गृहीत आहे. हे दशधर्म, आत्म लक्षणं उत्तम क्षमा, मार्दव, आर्जव, शौच शुचिता, सत्य, संयम, तप, त्याग, अकींचन्य व ब्रह्मचर्य असे मानले आहेत. या लेखमाले मध्ये आपण क्रमाने यातील प्रत्येक आत्म धर्माचे आध्यात्मिक व सामाजिक दृष्टीने विचार विश्लेषण करणार आहोत.

बलराज संघई, 9420015108, छत्रपती संभाजीनगर



## आदरणीय गुरु नाट्याचार्य श्रीमती आशा सुनील कुमार

लेखिका: डॉ मीना श्रीवास्तव ठाणे मो. 99201 67211



सुमारे दहा वर्षांपूर्वी, जेव्हा माझी नात अनुभूती बॅनर्जी अवघ्या सात वर्षांची असताना या प्रसिद्ध अकादमीत दाखल झाली, तेव्हा भरतनाट्यम नृत्याला समर्पित असलेल्या या महान कलावतीशी माझा परिचय झाला.

या लेखाद्वारे मी एका अशा सर्वश्रेष्ठ शिक्षिकेला वंदन करते, ज्या आपल्या विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी सदैव झटत असतात, एक अशा गुरु, ज्या आपल्या शिष्यांना यशोशिखरावर पोहोचण्यासाठी सतत प्रेरित करतात. एक उदात्त व्यक्तिमत्व असलेल्या या गुरूंचे मार्गदर्शन आणि उत्तेजन लाभल्यामुळे त्यांच्या शिष्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आपल्या सर्वोच्च क्षमतेच्याही पलीकडे पोहोचतात. त्या नियमित अभ्यासक्रमाशी बांधील असलेल्या शाळा किंवा महाविद्यालयातील एक सामान्य शिक्षिका नाहीत.खरं तर, येथील अभ्यासक्रम या गुरू प्रत्येक विद्यार्थिनीसाठी वैयक्तिक संवाद आणि निरीक्षणाद्वारे निश्चित अवधीसाठी खास तयार करत असतात.

मंडळी, ही व्यक्ती म्हणजे ठाण्यातील 'संस्कृती अकादमी ऑफ फाईन आर्ट्स' च्या संस्थापक - संचालिका, मान्यवर गुरु नाट्यचार्य श्रीमती आशा सुनील कुमार!

प्रशिक्षणाच्या सुरुवातीच्या काळात, संस्थेच्या सहायक शिक्षिका अनुभूतीला नृत्याचे धडे देत असत. कधीकधी, मी तिला नृत्याच्या वर्गात सोडल्यावर परत आणण्यासाठी तिथेच थांबत असे. तेव्हा विद्यादानाची ही अनोखी प्रक्रिया बारकाईने निरखून पाहायची मला आपसूकच संधी मिळत असे. गुरु आशांच्या केवळ उपस्थितीनेच तेथील वातावरण उजळून निघायचे. विद्यार्थिनी त्यांना आदराने त्यांना वंदन करून त्यांच्या निर्देशांचे पालन करत असत. त्या प्रत्येक शिष्येवर बारकाईने लक्ष ठेवत आणि त्यांची अगदी लहानशी चूकही गुरूंच्या नजरेतून सुटत नसे. त्यांचा कठोर स्वभाव प्रत्येक विद्यार्थ्याला आणि पालकांना पहिल्या दिवसापासून चांगलाच ठाऊक होत असे.

(या अकादमीत केवळ विजयादशमीच्या शुभ दिनी नवीन विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात येतो.)

अनुभूतीच्या प्रशिक्षणाची वर्षे सरत होती. गेल्या वर्षी मार्च-एप्रिलच्या सुमारास गुरु आशा यांनी अनुभूतीला, तिच्या नृत्य-सख्या, नेहा आणि अग्रणी यांच्यासोबत, जुलै-ऑगस्ट २०२६ या काळात भरतनाट्यम अरंगेत्रमसाठी तयारी करण्याची परवानगी दिली. (क्रमशः)



## पुराणातील विश्व : एक चिकित्सक अन्वेषण (भाग-७)

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्-bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३

### पुराणातील विश्वकल्पना आणि आधुनिक खगोलशास्त्र एक तुलनात्मक दृष्टिकोन

उत्तरार्धः

विश्वाची रचना :

पुराणातील विश्व ही स्तरबद्ध आणि चक्रीय रचना आहे. सृष्टीची निर्मिती, स्थिती आणि प्रलय यांचे चक्र अत्यंत विशाल कालमानात चालते. आधुनिक विश्वविज्ञानात विश्वाची उत्पत्ती, विस्तार, आकाशगंगा, तारे, कृष्णविवरे, डार्क मॅटर आणि डार्क एनर्जी यांसारख्या संकल्पनांचा अभ्यास केला जातो. आधुनिक विश्वाचे वय सुमारे १३.८ अब्ज वर्षे असल्याचे आजच्या निरीक्षणाधारित विश्वविज्ञानातून मानले जाते. दोन्ही विश्वदृष्टींमध्ये अत्यंत विशाल कालमानाची कल्पना आढळते, हे एक मनोरंजक साम्य आहे. परंतु त्यांचा आधार आणि अर्थ वेगळा आहे. म्हणून या साम्याला थेट वैज्ञानिक पूर्वज्ञानाचा पुरावा मानता येत नाही.

मग साम्य नेमके कुठे आहे?

या तुलनेतून तीन प्रकारचे साम्य दिसते. पहिले म्हणजे आकाशाचे सातत्यपूर्ण निरीक्षण. सूर्य, चंद्र, ग्रह आणि नक्षत्रे यांचे महत्त्व दोन्ही परंपरांमध्ये मान्य आहे. दुसरे म्हणजे विश्वाला एक क्रमबद्ध रचना आहे अशी मूलभूत जिज्ञासा आणि तिसरे म्हणजे अत्यंत मोठ्या कालमानांचा विचार, परंतु यापेक्षा पुढे जाताना सावध राहणे आवश्यक आहे. पुराणातील विश्वरचना आधुनिक खगोलशास्त्राची पूर्वरूपे आहेत, असा निष्कर्ष या साम्यांवरून काढता येत नाही. आधुनिक विज्ञानाची वैशिष्ट्ये म्हणजे मोजमापांची अचूकता, गणितीय मॉडेल, निरीक्षणांची पुनरावृत्ती आणि स्वतंत्र पडताळणी, म्हणून पुराणांचे खरे महत्त्व दुसरीकडे आहे.

ते आपल्याला सांगतात की हजारो वर्षांपूर्वी भारतीय मनुष्याने विश्वाबद्दल प्रश्न विचारले होते.

विश्वाची उत्पत्ती काय?

त्याची रचना कशी आहे?

काल किती विशाल आहे?

सूर्य-चंद्र-नक्षत्रांचे स्थान काय?

सृष्टी निर्माण होते आणि नष्ट होते का?

हे प्रश्न आधुनिक विज्ञानाच्या आधीही मानवी बुद्धीला पडत होते, म्हणून पुराणांचा अभ्यास हा केवळ 'आपल्या पूर्वजांना आधुनिक विज्ञान माहीत होते का?' या प्रश्नापुरता मर्यादित न राहता 'मानवाने विश्व समजून घेण्याचा प्रयत्न कसा केला?' या अधिक व्यापक प्रश्नाच्या दिशेने नेला पाहिजे आणि याच दृष्टीने विष्णुपुराणातील ग्रहांची अंतरे पुन्हा पाहण्याची गरज आहे. कारण त्या संख्यांचा वैज्ञानिक अर्थ आधुनिक खगोलशास्त्राशी तंतोतंत जुळत नसला, तरी त्या संख्यांच्या मागे असलेली मोजण्याची, वर्गीकरण करण्याची आणि विश्वाला एका क्रमबद्ध चौकटीत समजून घेण्याची वृत्ती निश्चितच अभ्यासनीय आहे.

पुढील भागात आपण या संख्यांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू तपासू विष्णुपुराणातील अंतरांची एकूण बेरीज किती होते आणि ती कोणत्या विश्वरचनेचा संकेत देते? तसेच या मांडणीची तुलना इतर पुराणांतील विश्ववर्णनाशी करता येते का, हेही पाहू.

क्रमशः भाग-८: विष्णुपुराणातील विश्वरचना : इतर पुराणांशी तुलनात्मक संदर्भ

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# "गणेश चतुर्थी" तयारी आणि भक्तिमय वातावरण

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या भारतीय संस्कृतीतील एक भक्तिमय सोहळा म्हणजे गणेश चतुर्थी. गणेश चतुर्थी म्हटलं कि, भक्तांच्या भक्तीचा सोहळा पूजे-अर्चेचा मेळा. लाडक्या बाप्पाचं आगमन म्हटलं कि तयारीला उधाण येतं. मार्केट सुंदर सुंदर गणेश मूर्तिन्नी सजलेलं असतं. कामाची, प्रसादाची, फुलमाळांची, सजावटीची जणू रेलचेल असते. चिमुकल्यांपासून अगदी मोठ्यांपर्यंत प्रत्येक जण बाप्पाच्या आगमनाच्या तयारीत असतो. कधी एकदा बाप्पाला घरी आणतो असं होतं. मोठ्यांपासून अगदी लहानग्या चिमुकल्या पर्यंत सर्वजण आनंदाने, हर्षाने तयारीला लागलेले असतात. गणेश चतुर्थीची शाळेला सुट्टी जाहीर होण्याआधीच मुलं स्वतःच सुट्टी जाहीर करतात. काय तो आनंद, काय तो भक्तीरस सगळं कांही मन भावनारं असतं.

चिमुकली लहानगी मुलं स्वतः च्या इवल्याशा हातांनी बाप्पासाठी मुकुट, लोलक, तिलक, मोती माळा, बाजूबंद, सुंदर वस्त्रे खरेदी करतात. बाप्पाची सुंदर सजावट करतात. लहान लेकरांचा आनंद द्विगुणित झालेला असतो. शाळेतून कधी एकदा घरी जातो असं होतं. ही बाप्पाची ओढ. आजी आजोबा, आई बाबा, ताई, दादा आलेले पाहुणे राऊळे घरातील सर्वजण सकाळ संध्याकाळ मनोभावे बाप्पाची आरती करतात.

गुळाचे मोदक, तांदूळाचे उकडीचे मोदक, पेढ्याचे मोदक, गूळ, तीळ, शेंगदाण्याचे मोदक, गव्हाच्या पिठाचे मोदक, मोतीचूर लाडू, पाच फळे



प्रसादाने भरलेलं ताट, आंबा व




केळीच्या पानांनी सजवलेलं देवघर, सुंदरशा रांगोळ्या. सकाळच्या राम प्रहरापासून रात्री झोप लागेपर्यंत घरात वाजत असलेली लाडक्या बाप्पाची गाणी, भक्तीगीते ऐकून मन प्रसन्न होतं. आपण बाप्पाची भक्तीगीते ऐकत, बाप्पाच्या भक्तीत तल्लीन झालेलो असतो. बाप्पाची गाणी ऐकत घरातील कामं अगदी चुटकीसरशी होतात.

संध्याकाळी गल्लीबोळातील सर्वजण थाटामाटात बाप्पाला घेऊन येतात. तो ढोल-ताशांचा, टाळ, मृदूंग, बँड, तऱ्हेतऱ्हेची भक्तीगीते, भक्तांच्या मुखी गणरायाची गाणी. बाप्पाच्या भक्तीगीतांनी सारा आसमंत दुमदुमलेला असतो, भक्ती गीतांमध्ये तल्लीन झालेली भक्तगण मंडळी बेभान होऊन नाचतात, गातात अन त्या आनंदात बाप्पाचं मनोभावे स्वागत करतात. गणरायांच्या आगमनाने वातावरण निर्मळ झालेलं असतं. सर्वजण मनातील द्वेष, मत्सर, दुजाभाव बाजूला सारून लाडक्या गणरायाचं, लाडक्या बाप्पाचं मिळून स्वागत करतात.

सर्वांना गणेश चतुर्थीच्या आनंदमय शुभेच्छा...!

# मनाच्या तळाशी

**ज्योतिर्मय साहित्य**

कधी कधी कस होत ना! शब्दांनी शब्दासाठी शब्दसुमने उमलावी,हे काय नवीन नाही, मी म्हणते म्हणून अगदी सोप आहे, असं ही नाहीच. पण शब्दांच्या पलीकडे ही काहीतरी असते,आणि त्याची जाणीव तेव्हा होते, जिथे शब्द ही नाही पण भावना ही निःशब्द होतात.

एक असं जग असत,
शब्दांच्या दुनियेत त्याला स्थान नसत.
शब्दांपेक्षाही त्यात खूप काही असतं,
मनाच्या खोल तळाशी भावनेनं ते बांधलेलं असत.

एखादा क्षण असा येतो, काळ येतो नवा अनुभव देवून निघून जातो, नि मग तो क्षण येतो....

वेदनेचा शिनवटा ओंजळीतल्या त्या स्पर्शात ते मिटलेले डोळे पाहताच हवेत विरून जातो, नी आनंदाचे परमोच्च शिखर गाठतो, अशा अवचित क्षणी शब्दा पेक्षाही तिथे खूप खूप काही असते.ते शब्दात व्यक्त होत नसते. सुंदर कळी ने हाताच्या ओंजळीत मिटलेल्या पाकळी ने अलगद हळूवार उमलत जावे,आणि ते नयनरम्य दृश्य नजरेस पडावे, सहज चालता चालता उंबराचे फुल फुललेले दिसावे नि तो क्षण तसाच डोळ्यात साठवावा. असे..

निसर्गाच्या सानिध्यात गेल्यानंतरही असे कधीतरी घडते,म्हणजे ऊन सावल्यांचा बाबतीतही म्हणजे मला ऊन सावल्यांत रमायला पाहायला आवडते म्हणून असेल कदाचित, दूरवर पसरलेल्या त्या सावल्या कित्येकदा त्यात खूप काही जाणवत असत. लिहावस वाटतं पण का माहित नाही, तेव्हा ही शब्द सापडत नाहीत, अगदी शब्दांच्या पलीकडे ही काहीतरी आहे असे वाटते. कधीतरी आईवर कविता करावीशी वाटते, पण ...म्हणजे लिहायच्या अगोदर ही असे वाटते की खूप काही आहे.पण लिहायला गेलं की ती कविता जशी हवी असते तशी नाही होत,तेव्हा ही असच होत,

एकांती आरशातल प्रतिबिंब पाहून ही कधी कधी खूप काही प्रश्न पडतात, जे शब्दांच्या ही पलीकडचे असतात. अस्ताला जाणारा तो रवि आणि चोर पावलांनी येणारी रजनी त्या दोहोंच्या मध्ये हीअसणारा तो काळ शब्दांच्या ही पलीकडचे असतात.

लिहता लिहता डोळ्यासमोर येणारी अक्षरे आणि त्या अक्षरा पलीकडचे ते जग..

दूरच्या वाटेवर चालताना जड होणारी पावले आणि...

दूर पर्यंत जाणारी ती नजर...




नजरेच्या त्या टप्प्यात खूप काही सामावलेल असत,पण त्यावेळी शब्द कुठल्याशा जाणिवेच्या पोकळीत हरवतात.जे शब्द रूपाने बाहेर पडत नाहीत. एक उदाहरण म्हणजे सहज एखाद्या शांत सुमधुर अशा संगीताच्या दालनात प्रवेश करावा आणि तेथील मोत्याच्या सुंदर माळेला धक्का लागावा आणि तुटणारे ते मोती घरंगळून जाणारा तो आवाज त्या आवाजात किती काही असते,पण शब्दात ते व्यक्त होत नाही.

म्हणजे आलेला आवंढा गिळून पुन्हा.. म्हणजे समुद्रात एखादी लाट यावी नि सार काही आतमध्ये सामावून पुन्हा शांत व्हावी..

मागे वळून पाहताना त्या छोट्या छोट्या तुषारानी काठाला ओलेचिंब करत त्याच पाण्यात वाहून पाण्यासारखीच व्हावी..

खरेच निःशब्द...


# वाघीरे महाविद्यालयात रोजगार मेळाव्याचे आयोजन


**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वाघिरे महाविद्यालय, सासवड येथील वाणिज्य विभाग, प्लेसमेंट विभाग आणि अभिष्का सोल्युशन्स, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांसाठी बँकिंग आणि फायनान्स या क्षेत्रातील विविध रोजगार संधींबाबत रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लातूर सहकारी बँकेचे क्षेत्रीय अधिकारी श्री अभिजीत सावंत आणि अभिष्का सोल्युशन्स, प्लेसमेंट सेंटर पुणे येथील प्रतीक्षा गावडे यांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेत सदस्य आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, वाणिज्य विभागाचे समन्वयक डॉ.नरसिंग गिरी,वाणिज्य विभागप्रमुख डॉ. किशोर लिपारे, प्लेसमेंट सेलचे समनव्यक प्रा. दिपक लोखंडे, प्रा. शुभम एक्के आणि



वाणिज्य, बीबीए व बीसीए विभागातील १३२ विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री अभिजीत सावंत यांनी पुणे व परिसरातील बँकिंग आणि फायनान्स क्षेत्रामधील विविध रोजगारांच्या संधी आणि त्यासाठी आवश्यक कौशल्य व पात्रता व मुलाखतीसाठी आवश्यक बाबींचे विश्लेषण केले. त्यानंतर आपल्या अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या संधीचे सविस्तर विश्लेषण केले. बदलत्या काळानुसार व तंत्रज्ञानानुसार वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना अनेक क्षेत्रांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत पण त्यासाठी विद्यार्थ्यांनी आवश्यक कौशल्य व पात्रता धारण केली पाहिजे यासोबतच नवीन तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे असे प्रतिपादन केले. यावेळी त्यांनी मुलाखतीसाठी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यानंतर पार पडलेल्या मुलाखत प्रक्रियेमध्ये वाणिज्य शाखेतील ५२ विद्यार्थ्यांची प्रथम फेरीतून दुसऱ्या फेरीसाठी निवड करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ.किशोर लिपारे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. नरसिंग गिरी यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन वाणिज्य विभाग व प्लेसमेंट विभागाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे केले. यासाठी वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्री संतोष लोणकर, श्री शैलेश राऊत व श्री. गणेश खोडके यांचे सहकार्य लाभले.






रोबोट !!

मिसेस म्हणाली एकदा कंटाळले बाई कामाला
आणायचं कां रोबोटला घरगुती कामकाजाला

झाडू पोछा स्वयंपाक प्रोग्राम करुन दिला सेट
महिला मंडळाचे मिटिंगला मिसेस गेली थेट

आनंदी आनंद श्रीमतीला अतिशय जास्त झाला
बाकी इतर कामाला चांगला हातभार लागला

पण लवकरच मिसेसला साक्षात्कारच झाला
कसा चुकला रे होरा उगाचच लागले नादाला

दहीभात भरवितांना रडणाऱ्या बाळ राजाला
हतप्रभ झाला यंत्रमानव मायेच्या हो तंत्राला

बाळ राजा रडवेला अश्रू ढाळीत थकून गेला
माय माउलीचे मायेला पारखा होऊन झोपला

तिनं उघडून बघितला छातीचा कोरा पिंजरा
हदय विहिन आढळला सारा रोबोटी पसारा

रोबोटी विश्व तंत्रज्ञान आदेशात्मक संभावना
आस्थाहिन ममता विरहीत कोरडीच भावना

घरातीलं रे काम काज प्रेममयी कर्तव्यपूर्ती
निस्पृह सेवा समर्पित ठेवा स्वर्गीय अनुभूती

यंत्र मानवाचे अर्धसत्य उमजले श्रीमतीला
भावशून्य रोबोटी तंत्र नकोच रे घर कामाला


प्रफुल्ल ठाकरे अमरावती
मोबा.94202 38021
















आलास.?......

वर्षभरात किती बदलून गेलास ?...
किती जणांच्या प्रश्नांची उत्तरे घेऊन
आलास....
मागायचं काहीच नाही रे
तुझ्याजवळ.....
काय ठेवलेस तू माझ्याजवळ??..
लेकराचं सौख्य हवंय एका आईला...
पण हे कधी कळणार तुला.....?
तुझ्या अवतीभोवती डीजे,
ढोलताशे आणि नाटकी वृत्ती....
आजूबाजूच्या हुकूमशाहीला कधी
देणार तू सुट्टी..?
बघतोस ना....! पेपर फुटीचे
जीवघेणे सोहळे??
MPSC परीक्षेच्या स्वप्नात चिरडले
जात आहेत... सर्व छत्रपतींचे
मावळे...
कित्येक लेकरांची हरल्याने
आत्महत्या काळजाला चिरे
देतायेत......
आई-बाबांचा आक्रन्द-आक्रोश कसे
सांभाळावेत?
कित्येक घरे उध्वस्त झालीत....
लेकरांची स्वप्ने धुळीत गेलीत....
कशी अवस्था होणार उडत्या
पक्षांची?...
पंखच कापण्यात येतात इथे
लेकरांची.....
देशील का आतातरी निष्पाप
लेकरांना साथ....?
हताश लेकरांना हवाच रे तुझ्या
मदतीचा हात.....
बाकी तुला कळलंय.. मला काय
बोलायचं.....
साठलेल्या काळजातलं तुला कसं
सांगायचं??...

वृषाली वानखडे...... अमरावती.
9921424125.



*श्री गणेशाय नमः*

*ॐ श्री गजानना श्री लंबोदरा श्री विनायका,*
*आस तुझी या दर्शनाची ही लागली,*
*सारे नभ समस्त जीवसृष्टी ही न्यारी*
*जयघोषात आता मग्न होऊ लागली.*

*हरवते दुःख चिंता व्यथा मनाची,*
*अशी आम्हास ओढ ही भेटीची.*
*भक्ती ही भोळ्या भक्तांची अशी,*
*कीर्तन अंतर्मनी चाले तुझ्या नामाची.*

*कर्म कार्य करीता सर्व,*
*तुझा ध्यास हा सदैव राहो.*
*भक्तांवरी तुझी कृपा ही,*
*अशी निरंतर पाठीशी राहो.*

*साथ तुझी प्रवासांत आयुष्याच्या,*
*मोलाची अशी आम्हास लाभलेली.*
*पाऊलवाट काट्यांची ती खडतर जणू,*
*वाटते ही आम्हास तूच फुलांनी माखलेली*

*-तुषार लाखे.*
*- वरोरा जिल्हा चंद्रपूर.*




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559


# फुले साहित्य : अब्राह्मणी इतिहासाचा आरंभ

ज्योतिर्मय साहित्य

म. फुले यांनी प्रामुख्याने समाजाच्या उन्नतीला पूरक व मानवजातीचे कल्याण साधणारे लेखन केले आहे. प्रामुख्याने गद्य, पद्य, नाटक, पत्रव्यवहार व स्फुटलेखन इत्यादी प्रकारात त्यांनी लेखन केले असून समाजाला एक योग्य दिशा देण्याचे काम लेखणीच्या माध्यमातून फुले यांनी केले आहे. महात्मा फुले यांच्या व्यक्तित्वाचा महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची चिंतनशील वृत्ती. त्यांच्या या चिंतनशील वृत्तीमुळे त्यांच्या वाङ्मयात समाज चिंतन, धर्मचिकित्सा, व्यक्तिस्वातंत्र्य, मानवी हक्क आणि मानवी मूल्ये यांचे विचार आले. यामधून वाङ्मयाची मूल्याशी असलेली बांधिलकी स्पष्ट होते. सूक्ष्म निरीक्षण आणि समाजचिंतन यामुळे त्यांच्या वाङ्मयाचे स्वरूप व्यापक बनले. समाज, धर्म, मानवी जीवन या विषयीचे मूलगामी विचार त्यांनी आपल्या वाङ्मयात मांडले. विविध प्रचलित पुराणोक्त प्रथा परंपरांना मोडीत काढत म. फुलेंनी प्रामुख्याने सर्वसामान्यांच्या दुःखांना वाचा फोडली आहे. आपल्या विविध साहित्याच्या माध्यमातून त्यांनी स्त्री व शूद्रातिशूद्रांच्या जीवनावर वस्तुनिष्ठ प्रकाश टाकला असून शूद्र, अतिशूद्र आणि स्त्री हे त्यांच्या चिंतन लेखनाचे आणि कार्याचे प्रमुख केंद्र होते. जातीय उतरंडीमुळे त्यांची आर्थिक दुर्दशा कशी झाली यावरील साद्यंत विचार फुलेंनी अतिशय पोटतिडकीने शेतकऱ्यांचा असूड या इतिहास ग्रंथात मांडला आहे. शूद्रातिशूद्रांच्या, कष्टकऱ्यांच्या दैन्यावस्थेला एक विशिष्ट समाज जबाबदार असल्याचा निर्वाळा फुले यांनी दिला आहे. मूलतः शेतकऱ्यांच्या शोषणाला फुलेंनी आर्थिक शोषणाचा इतिहास म्हटले आहे. महात्मा फुलेंनी सतत आयुष्यभर आपली बांधिलकी उपेक्षित वर्गाबरोबर जाहीर केली. अनेक शतकांपासून रूढी परंपरा प्रथांच्या तसेच अज्ञानाच्या जाचक जोखडात सापडलेल्या सर्व स्त्री पुरुष कष्टकरी जनतेच्या व्यथा आणि त्यावरील उपाय महात्मा फुल्यांनी सांगितले आहेत. उपेक्षित वर्गाच्या दारिद्र्याच्या दुःखाचा वेध घेत असताना म. फुलेंनी आपल्या समकालीन समस्यांची पाळेमुळे इतिहासात कशी दडली आहेत हे सिद्ध केले आहे.

म. फुलेंनी आपल्या लिखाणातून शूद्रातिशूद्र, शेतकरी, कामगार व शोषित समाजव्यवस्था यासंदर्भात चौफेर इतिहासलेखन केले आहे. मूलतः फुलेंनी लिहिलेले सर्व साहित्य एक उत्तम इतिहासग्रंथ आहेत. फुलेंनी भारतातील शोषण संबंधाचा अधिक चिकित्सक व उदाहरणादाखल उलगडा केला आहे. सत्यशोधक

चळवळीचा व्यापक दृष्टिकोण समोर ठेवून धर्माच्या माध्यमातून दडपलेला इतिहास शोधणे, शोषणव्यवस्थेचा मूलाधार शोधणे फुले यांच्या इतिहास मीमांसेचा आधार आहे. विशेषत्वाने मिथककथांचा, जाणिवांचा व स्मृतीचांही वापर म. फुलेंच्या इतिहास मांडणीचे मूळ सूत्र आहे. जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, स्वर्ग नरक, पाप पुण्य, परलोक, वेदांचे अपौरुषयत्व, धर्मग्रंथातील स्वार्थ, धर्मकल्पना, पुराण कथा इत्यादींना त्यांनी बुद्धिप्रामाण्याच्या कसोटीवर घासून त्यातील फोलपणा तर्कशुद्ध पद्धतीने लोकांना सांगितला. भट-ब्राह्मणांनी आपला श्रेष्ठपणा, पावित्र्य, शूद्रातिशूद्रांच्या मनावर बिंबविण्यासाठी थोतांडी धर्मग्रंथ निर्माण केल्याचे फुलेंनी इतिहास संशोधनाद्वारे सिद्ध केले आहे. म्हणूनच म. फुले हे भारतीय इतिहासा -संदर्भात वंचितांचा इतिहास लिहणारे पहिले व आद्य इतिहासकार ठरतात.



महात्मा फुले यांच्या एकूणच लेखनाची बैठक मानवी मूल्यांवर आधारित आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा पुरस्कार त्यांनी आपल्या वाङ्मय निर्मितीत केला. सनातनी संस्कृतीची चौकट मोडून टाकून नवीन समाजरचना करण्यासाठी महात्मा फुले यांनी स्वीकारलेली ही तत्त्वे निश्चितच महत्त्वाची होती. महात्मा फुले यांचा मानवतावादी दृष्टिकोणही त्यांच्या वाङ्मयाला एक मोल प्राप्त करून देणारा ठरला. वाङ्मय आणि जीवन यांच्यातील अतूट नाते त्यामुळे अधिक जवळचे बनले. वाङ्मयाचे क्षेत्र अधिक व्यापक बनण्यास व मानवी जीवनाचे मानवी प्रतिष्ठेच्या दृष्टीने वाङ्मयातील स्थान व महत्त्व निश्चित करण्यात वाङ्मयाचे मोलाचे योगदान असते हे स्पष्ट होते. महात्मा फुले यांच्या व्यक्तित्वातील प्रखर ध्येयनिष्ठेमुळेही त्यांच्या सामाजिक कार्याला आणि वाङ्मयाला एक आकार प्राप्त झाला. त्यांच्या ध्येयनिष्ठेला प्रखर इच्छाशक्तीची जोड मिळाल्याने ते ध्येयपूर्तीच्या मार्गाने खंबीरपणे वाटचाल करू शकले. त्यांच्या व्यक्तित्वातील लढाऊपणा, बंडखोर वृत्ती, रोखठोकपणा, निर्भिडपणा त्यांच्या वाङ्मयातून प्रकट होतो. त्यांच्या या व्यक्तित्वामुळेच त्यांच्या वाङ्मयाला एक प्रखर धार येऊ शकली. आपले विचार ते रोखठोकपणे वाङ्मयातून मांडू शकले.

महात्मा फुले यांनी त्यांच्या काळात पारंपरिक स्वरूपाची वाङ्मय निर्मिती होत असताना त्या वाङ्मयापेक्षा निराळ्या स्वरूपाचे म्हणजेच मानवी मूल्यांची जोपासना करणारे वाङ्मय निर्माण केले. मौखिक परंपरेने प्रचलित असलेल्या लोकवाङ्मयातील पद्य या प्रकारातील रचना स्वीकारून नवा आशय त्यातून लोकांपुढे मांडला. प्रत्यक्षार्थ प्रणालीच्या आधारे त्यांनी इतिहासातील नवसंदर्भजगासमोर आणले. वंचिताचा इतिहास




रेखाटणारी नवीन इतिहास प्रणाली जन्मास घातली. बहुजनांच्या भाषेला आपल्या वाङ्मयात स्थान दिले. समाजाचे मूलगामी प्रश्न आपल्या वाङ्मयातून मांडून सुधारणावादी नवनवीन इतिहासग्रंथाची रचना केली. महात्मा फुले यांच्या विचारांचे स्वरूप समाजसुधारणेचे असल्याने समाजाचे अनेक प्रश्न त्यांनी आपल्या वाङ्मयातून मांडून त्यावरील उपायही सुचविले आहेत. त्यांच्या या एकूण विचारविश्वात सनातनी हिंदू संस्कृतीतील अन्यायकारक बाबी, धर्मग्रंथ, धर्मकल्पना, रूढी प्रथा, ईश्वराची कल्पना, पारंपरिक समाजरचना, जातिव्यवस्था, शूद्रातिशूद्रांचे व स्त्रियांचे जगणे, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक शोषण, ब्राह्मण्य, विद्येचे महत्त्व, शेतकरी व शेती सुधारणा, स्त्रियांचे विविध प्रश्न, गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म इत्यादी विषयक महात्मा फुले यांचे चिंतन आहे. त्यांच्या चिंतनाची बैठक मानवतावादावर आधारलेली असून स्वातंत्र्य, समता व बंधुता या मानवी मूल्यांचा स्वीकार त्यात केलेला आहे. महात्मा फुले यांचे एकूणच वाङ्मय त्यांच्या तत्त्वज्ञानाला प्रकट करणारे आहे. त्यामुळे चिंतनशीलता हा त्यांच्या वाङ्मयाचा महत्त्वाचा विशेष आहे. महात्मा फुले यांच्या वाङ्मयाला एक वैचारिक बैठक आहे. समाज परिवर्तन विषयक विचार सांगण्यासाठी महात्मा फुले यांनी इतिहास ग्रंथाची निर्मिती केली आहे. ज्या नव्या समाजरचनेचे स्वप्न महात्मा फुले यांनी पाहिले होते, ज्या समाजक्रांतीच्या मार्गाने आपली वाटचाल केली होती, त्यांचे एक साधन म्हणून महात्मा फुले यांनी संशोधनात्मक इतिहास ग्रंथाची निर्मिती केली. जनजागरण, लोकजागृती हा महात्मा फुले यांच्या वाङ्मय निर्मितीचा उद्देश होता. महात्मा फुले यांच्या वाङ्मयातून तत्कालीन समाज स्थितीचे दर्शन घडते.

महात्मा फुले यांनी समाजपरिवर्तनाचे, समाजक्रांतीच्या कार्याचे एक साधन म्हणून वाङ्मयाची निर्मिती केली. इतिहासातील घटनांचा वेध, वैज्ञानिक व मानवतावादी दृष्टीने त्यांचा अर्थ लावण्याची प्रक्रिया, तर्कशुद्ध विचार मांडणी, सूक्ष्म समाज निरीक्षण आणि रोखठोकपणे सांगणे हे त्यांच्या गद्य लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. महात्मा फुले यांच्या वाङ्मयातून समाजातील उपेक्षित, माणूसपण नाकारलेल्या वर्गाचे वास्तव शब्दचित्रण पहावयास मिळते. महात्मा फुले यांच्या वाङ्मयातून दलित जाणिवा, ग्रामीणांचे प्रश्न, समाजवास्तव चित्रित झालेले आहे.

महात्मा फुले यांच्या वाङ्मयातून सनातनी हिंदूधर्म, धर्मग्रंथ, पुराणकथा यांची चिकित्सा, त्यांतील अन्यायकारक व खोटारड्या बाबीविषयींची महात्मा फुले यांची स्पष्ट मते व्यक्त झालेली आहेत. मानवतावाद साधणे, स्त्री, शूद्रातिशूद्र व बहुजनांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी आपली लेखणी झिजवली. त्यांच्या एकूण लेखनातून सामाजिक, धार्मिक, राजकीय वैचारिक प्रबोधनांची विविधांगे तृतीयरत्न नाटकापासून ते सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकापर्यंत प्रकट झाली आहेत.

धर्मविचार आणि नीतिमूल्याचे प्रतिपादन करत मानवी समाजाच्या उन्नतीचा मार्ग सांगितला. सत्य, नीतिमत्ता, स्त्री-पुरुष समानता, उच्च-नीचता निषेध, या सर्व शोषणापासून मुक्ती व मानवी उन्नतीसाठी साहाय्यभूत होणारा धर्म त्यांना अपेक्षित होता.




## जगाच्या कोलाहलात मनाला लाभलेली शांत जागा म्हणजे कविता-कवी प्रा.वा. ना.आंधळे

### कवी पी.जी. चौधरी सर यांच्या चाहूल या काव्यसंग्रहाचे प्रकाशन संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

एरंडोल - कविताच जर जन्माला आली नसती तर सृष्टी,दृष्टी आणि मानवी जगणं भकास झालं असतं. कवितेनं माणसाला माणूस केलं. जगण्याला मोल दिलं.निकोप समाज व्यवस्था उभी राहत गेली ती कविता या साहित्य प्रकारामुळे. कारण मानवी मनाजवळ सहजी जाणारा हा वाङ्मय प्रकाराने समाजाला ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी मिळाली तुकोबांच्या गाथेतील अभंग घराघरात पोहचले, पराक्रमाची व देशभक्तीची कवने असो वा मानवता धर्माची शिकवणूक असो या संपूर्ण संस्कारांची पेरणी झाली ती कवितेमुळे.म्हणून मला हा साहित्य प्रकार सर्व साहित्य प्रकारांपेक्षा मनस्वी भावतो. असे काव्यमहात्म्य आज दि.१३.०९.२०२६ रोजी कमलनाम साहित्य मंच एरंडोल आयोजित कवी पी.जी. चौधरी यांच्या चाहूल या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभावेळी उपस्थित रसिक श्रोत्यांपुढे व्यक्त केले. प्रा.आंधळे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते.यावेळी खान्देशाचे सुप्रसिद्ध नाट्यकर्मी आयतं पोयतं सख्यानं या धमाल एकपात्री प्रयोगाचे सदरकर्ते मा. प्रवीण महाजन (शिरपूर) व नाशिक येथील मा. विजय भागवत महाजन यांचे शुभहस्ते चाहूल काव्यसंग्रहाचे दमदार प्रकाशन करण्यात आले.याप्रसंगी व्यासपीठावर चाहूल काव्यसंग्रहाचे कवी पी.जी. चौधरी सर माजी जि.प.सदस्य मा. नानाभाऊ महाजन, डायटचे प्राचार्य राजेंद्र महाजन, कवी निंबा पुना बडगुजर, प्रकाश श्रीराम माळी (तळोदा), रावसाहेब अरुणकुमार माळी, मा.नथ्थू काशिनाथ पिंपरे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभली. यावेळी कवी पी.जी. चौधरी सरांनी आपल्या मनोगतातून सृजन प्रेरणा विशद करीत काव्यलेखन प्रवासावर विस्ताराने भाष्य केले.सर्व प्रमुख अतिथींनी मनोगतातून कवी चौधरी यांच्या काव्यलेखन सौंदर्यावर आपली मतं मांडलीत. कमलनाम साहित्य मंचचे संचालक युवा कवी प्रग्नेश झाम्बरे यांनी कवी पी.जी. चौधरी यांच्या व्यक्तित्वावर मनोगतातून म्हटलेली कविता विशेष आकर्षण ठरली. अतिथी गणांना शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कवी प्रा.आंधळे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, कवी पी.जी. चौधरी यांनी भवतालातल्या सगळ्याच विषयांना आपल्या सृजनातून चांगला न्याय दिला असून त्यांच्या लेखनातील सहजता हे मला लेखनाचे सौंदर्य स्थळ वाटते असे विधान करीत त्यांच्या कवितांचे संदर्भ श्रोत्यांपुढे मांडलेत.

सदर समारंभास सूर्योदय जेष्ठ नागरिक संघ एरंडोलच्या सभासदांसह नगर वाचनालयाचे अध्यक्ष मा. जगदीश ठाकूर, माजी सैनिक रघुनाथ सुतार, माजी सैनिक ठाकूर, पीजी सरांचे माजी विद्यार्थी तसेच जळगाव,धुळे, नाशिक, शिरपूर तळोदा, मुंबई, बदलापूर येथून तसेच एरंडोल शहरातील जेष्ठ रसिक श्रोत्यांची भरगच्च उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.हेमंत चौधरी यांनी केले. तर काव्यमयी बहारदार सूत्र संचालन आदर्श शिक्षिका सौ.क्षमा साळी यांनी केले. आभार प्रदर्शन कमलनाम मंचचे उपाध्यक्ष कवी निंबा पुना बडगुजर यांनी केले. या बहारदार प्रकाशन समारंभाच्या यशस्वीतेसाठी प्रा.हेमंत चौधरी, कमलेश चौधरी, विनायक कुलकर्णी, प्रेमराज महाजन, शाळीग्राम चौधरी, भीमराव महाजन संपादक माळी भूषण, प्रग्नेश झांबरे, सौ. कांचन कमलेश चौधरी मॅडम, सौ.कांचन विजय महाजन, निंबा पुना बडगुजर, सुरेश देशमुख यांनी परिश्रम घेतले.यावेळी कमलनाम साहित्य मंचचे संचालक मंडळाची आवर्जून उपस्थिती लाभली.

## वाजत-गाजत, अपूर्व उत्साहात गणरायाचे जल्लोषात स्वागत!

### गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया चा जयघोष, सार्वजनिक मंडळांसह घरोघर श्रीं ची विधिवत प्रतिष्ठापना

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - गुलालाची मुक्तहस्ते उधळण करीत गणपती बाप्पा मोरया.. मंगलमूर्ती मोरया..च्या जयघोषात बॅण्डबाजासह ढोल-ताशांच्या गजरात वाजत-गाजत, हर्षोल्हासात आणि अपूर्व उत्साहात गणेशभक्तांनी गणरायांचे जंगी स्वागत केले. सार्वजनिक मंडळांसह घराघरांत सकाळपासून उशिरापर्यंत श्रीं ची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली.

मंगलमूर्तीच्या स्वागतासाठी सोमवारी, १४ रोजी सकाळपासूनच गणेशभक्तांमध्ये उत्साह संचारला होता. वरुणराजाच्या कृपादृष्टीमुळे भक्तांच्या उत्साहाला उधाण आले होते. ढोल-ताशांच्या दणदणाटात मंगलमूर्ती मोरया, एक-दोन-तीन-चार, गणपतीचा जयजयकार, आले रे आले गणपती आलेचा जयघोष करीत गणरायाचे मोठ्या उत्साहात व आनदाच्या वातावरणात आगमन झाले.

आठ दिवसापासून शहरात सर्वत्र गणरायांच्या आगमनासाठी जय्यत तयारी सुरू होती. दिवसभर गणरायाच्या स्वागतासाठी बाजारपेठेत खरेदीसाठी झुंबड उडाली होती. औरंगपुरा, निराला बाजार, गुलमंडी, मच्छली खडक, केळीबाजार, शहागंज, सिटीचौक, जवाहर कॉलनी, गारखेडा, टीव्ही सेंटरसह छावणी-बेगमपुरा, मिटमिटा-पडेगाव, मुकुंदवाडी-चिकलठाणा आदी भागांत मिरवणुकीने नेवून गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. बाजारात दिवसभर ग्राहकांची वर्दळ सुरू होती. घराघरांतही गणरायाचे हर्षोल्हासा स्वागत करण्यात आले.

गणेशभक्तांनी गणेश चतुर्थीच्या दिवशी लाडक्या बाप्पांना घरी घेऊन जाण्यासाठी सकाळपासूनच बालगोपाळांसह तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांची लगबग सुरू होती. जि. प. मैदान, औरंगपुरा, गुलमंडी, पैठणगेट, टीव्ही सेंटर, शिवाजीनगर, गारखेडा, गजानन मंदिर, जयभवानीनगर चौक, सिडको चौक, हडको चौक, गुरुगोविंदसिंगपुरा, रेल्वेस्टेशन, सेव्हनहिल, जालना रोड या भागात भक्तांची गर्दी उसळली होती. अनेक जण सहकुटुंब, मित्रपरिवारासह गणेशमूर्ती खरेदीसाठी आले होते. लहान मुलांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. आपली आवडती बाप्पाची मूर्ती खरेदी करून कुणी डोक्यावर, कुणी दुचाकीवर, कुणी हातगाडीवर, तर कुणी चारचाकीत घेऊन जात होते. गणेशभक्तांचा उत्साह आणि जल्लोष वाढतच होता.

वरूणराजाने वाढविला उत्साह

सोमवार सकाळपासून आकाश स्वच्छ होते.



त्यामुळे गणेशभक्तांचा आनंद वाढत गेला. जिल्हा परिषदेच्या मैदानावर सगळीकडे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. गणरायाच्या मूर्ती आणण्यासाठी आलेले गणेशभक्त गणरायाचा जयघोष करत होते. बहुतांश विक्रेत्यांनी पावसाची शक्यता गृहीत धरुन गणेशमूर्तींना प्लास्टिक पिशव्यांचे आवरण टाकून काळजी घेतली होती. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती खरेदीकडे ग्राहकांचा कल असल्याचे दिसून आले.

शाडूच्या मूर्तींना प्राधान्य

पर्यावरणपूरक शाडू मातीच्या मूर्तींना पसंती दिसून आली. दुसरीकडे नागपूरहून आणलेल्या लाल मातीच्या सुबक आणि आकर्षक गणेशमूर्तींना भक्तांनी पसंती दिली. अनेकजण पीओपीऐवजी शाडू मातीच्या आणि लाल मातीच्या मूर्ती खरेदी करताना दिसले. या मूर्ती तुलनेत महाग असूनही घराघरांत शाडू मातीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली.

खड्ड्यांतूनच श्रींचा प्रवास

गणरायाच्या आगमनापूर्वी दरवर्षी रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी पॅचवर्क केले जाते. यंदा मात्र महापालिका प्रशासनाने खड्डे बुजविण्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे भक्तांना रस्त्यावरील खड्डे, चिखल आणि घाण पाण्यातून गणरायांना घेऊन जावे लागले. शनिवारी, रविवारी झालेल्या पावसामुळे मिरवणूक मार्गावरील रस्त्यावर पाणी साचले होते. या पाण्यातूनच गणरायांची मिरवणूक काढण्याची वेळ भक्तांवर आल्यामुळे गणेशभक्तांनी तीव्र संताप व्यक्त केला.

श्रीसंस्थान गणपतीची स्थापना

शहराचे ग्रामदैवत असलेल्या राजा बाजार येथील श्रीसंस्थान गणपती मंदिरात श्रीगणेशाची स्थापना करून गणेशोत्सवाला सुरुवात झाली. यावेळी शहरातील आजी-माजी लोकप्रतिनिधी, संस्थानचे पदाधिकारी, गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थान गणपतीची महाआरती करण्यात आली. संस्थान गणपती मंदिरातर्फे यावर्षी विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गणपती अथर्वशीर्षची परंपरा यावर्षीही पाळली जाणार असून, दररोज गणपती अथर्वशीर्षचे पठण केले जाणार आहे.

मानाच्या गणपतींचे थाटात आगमन

शहरातील मानाचे गणपती म्हणून ओळखले जाणारे कुवार फल्ली, धावणी मोहल्ला, राजा बाजार, दिवाण देवडी, खडकेश्वर, खोकडपुरा, दानाबाजार, पानदरीबा, नारळीबाग, औरंगपुरा, पैठणगेट, नगारखाना गल्ली, चौराहा, कोकणवाडी, पदमपुरा, गारखेडा, गजानन मंदिर, सिडको-हडको, बालाजीनगर, शिवाजीनगर, सातारा-देवळाई, पडेगाव-मिटमिटा, चिकलठाणा या भागात मानाच्या गणपतीचे थाटात आगमन झाले. शहर परिसराती श्रीगणरायाच्या आगमनाचा रात्री उशिरापर्यंत जल्लोष सुरू होता.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559